POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-६३ ● मुंबई, रविवार,०५ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## क्षण आनंदाचा... शासकीय नोकरीतील प्रवेशाचा..!

### अनुकंपा तत्त्वावरील तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नियुक्त केलेल्या ५३० लिपिक टंकलेखकांना मिळाले शासकीय नोकरीचे नियुक्ती आदेश

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

अनुकंपा तत्त्वावर आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत लिपिक टंकलेखक पदासाठी निवड झालेल्या व ज्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली आहेत त्या उमेदवारांनी प्रामाणिकपणे व जबाबदारीने लोकाभिमुख काम करून विकसित महाराष्ट्र २०४७ चे स्वप्न पूर्ण करण्यामध्ये आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज येथे केले. अनुकंपा तत्त्वावरील व लोकसेवा आयोगामार्फत नियुक्ती झालेल्या एकूण ५३० लिपिक टंकलेखकांना नियुक्तपत्र देण्याचा ऐतिहासिक सोहळा ठाणे जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. त्याचप्रमाणे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे आयोजित राज्य स्तरावरील मुख्य राज्य रोजगार मेळाव्याचे दूरदृष्यप्रणालीद्वारे थेट प्रक्षेपणही यावेळी करण्यात आले होते.















याप्रसंगी आमदार संजय केळकर, आमदार सुलभा गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अपर आदिवासी विकास प्रकल्प आयुक्त गोपीचंद कदम, पोलीस अधीक्षक डॉ.डी. स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी सजेर्राव म्हस्के पाटील, वैशाली माने, उद्योग सहसंचालक विजू शिरसाठ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, जिल्हा अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क प्रवीण तांबे, तहसिलदार सचिन चौधर, संदीप थोरात, उमेश पाटील, सचिन शेजाळ, अभिजित खोले, अमित पुरी, विशेष कार्यकारी दंडाधिकारी मुकेश पाटील, सर्व नायब तहसीलदार, विविध शासकीय विभागांचे कार्यालयप्रमुख, नियुक्ती पात्र ठरलेले उमेदवार आणि पालक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ पुढे म्हणाले की, अनुकंपा विषयाबाबत तब्बल ४५ शासन निर्णयांबाबत एकत्र विचार करून हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. ‘‘कागदपत्रांची पडताळणी’’ हा अतिशय क्लिष्ट आणि वेळ लावणारा विषय सर्वांनी मिळून संघ भावनेने काम करून केवळ दोन ते अडीच महिन्यात पूर्ण केला. छाननी केलेल्या उमेदवारांसाठी समुपदेशन आणि माहिती मेळाव्याच्या माध्यमातून मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. या संपूर्ण प्रक्रियेत प्रशासनाने सर्वोच्च संवेदनशीलता आणि प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता जपली. सामान्य प्रशासन विभागाचे मनापासून आभार. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा संदेशाच्या माध्यमातून तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या नवनियुक्त उमेदवारांकडून ज्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत त्याप्रमाणेच या भारतमातेची समाजाची सेवा करा. मेहनतीशिवाय पर्याय नाही, जबाबदारीने काम करा, देशाच्या उज्वल भविष्याबाबत आजच्या तरुणांकडून खूप अपेक्षा आहेत, असेही ते शेवटी म्हणाले.

आमदार संजय केळकर म्हणाले की, आजचा हा सोहळा रोजगाराचा उत्सव आहे. शासन प्रशासनाने मिळून काम केल्यास सुशासन दिसून येते. सकारात्मक विचारांनी आपण जनतेचे हित प्रत्यक्षात बघू शकतो. महिला अधिकारी कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक आहे की, त्यांनी अधिकचा वेळ देऊन ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. राज्याच्या विकासाच्या वारीत नवनियुक्त उमेदवारांचा समावेश झाला आहे. शेवटी प्रामाणिकपणाने झोकून देऊन काम करा, असे आवाहनही त्यांनी नवनियुक्त उमेदवारांना केले.

राज्यात एकाच दिवशी एकाच वेळी दहा हजारहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याचा राज्य शासनाचा हा महारोजगार मेळावा होता. असा कार्यक्रम राज्याच्या इतिहासात प्रथमच संपन्न झाला. शासनाच्या १५० दिवसाच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमातून या कार्यक्रमाला गती मिळाली. यासाठी प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आले होते. यापुढेही शासनाकडून प्रतिक्षासूची व रिक्त पदे यांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येणार आहे. ठाणे जिल्हा नियोजन सभागृहातील या उत्साहपूर्ण कार्यक्रमात अनुकंपा तत्त्वावर गट क ९८ व गट ड १५९ मध्ये व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या २७३ अशा ५३० उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. शासकीय सेवेत असताना दुर्दैवाने मृत्यू झालेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. या कार्यक्रमानंतर मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदानाचा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक आशुतोष डुंबरे, पोलीस अधीक्षक डॉ. डी.स्वामी, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, तहसिलदार रेवण लेंभे, नायब तहसिलदार किशोर जाधव यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील आस्थापना शाखेतील सर्वच अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गेले काही दिवस अहोरात्र मेहनत घेतली.

प्रास्ताविक करताना निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांनी एकूणच ही अनुकंपा तत्वावरील तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून झालेली गट क व गट ड संवर्गातील कर्मचारी नियुक्ती प्रक्रिया कशा पध्दतीने राबविण्यात आली, समुपदेशन आणि मार्गदर्शन मेळाव्याच्या माध्यमातून उमेदवारांचे कशाप्रकारे प्रबोधन करण्यात आले, नियुक्ती देताना आलेल्या तांत्रिक अडचणी संवेदनशिलतेने विचार करुन नियमांचा सकारात्मक वापर करुन कशा प्रकारे सोडविण्यात आल्या, जिल्ह्यातील विविध एकूण ५४ कार्यालयांनी केलेले सहकार्य याविषयीची सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिध्द निवेदिका श्रीमती मंगला खाडीलकर यांनी केले. आभार प्रदर्शन तहसिलदार संदीप थोरात यांनी केले.

**राज्यभरात दहा हजारहून अधिक नियुक्तीपत्रे प्रदान**

राज्यस्तरावरील मुख्य राज्य रोजगार मेळावा हा ऐतिहासिक सोहळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. तर प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यक्रमांचे आयोजन करून नियुक्तीपत्रे दिली गेली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षानुवर्षे रखडलेली अनुकंपा नियुक्ती प्रकरणे मार्गी लावण्याच्या सूचना दिल्यानंतर, राज्यभरात शनिवारी ५ हजारहून अधिक उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर तर महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत शिफारस करण्यात आलेल्या ५ हजारहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्रे दिली गेली असून, या माध्यमातून एकाच दिवशी १० हजारहून अधिक उमेदवार शासकीय सेवेत दाखल होत आहेत. राज्य शासनात नियुक्त होणाऱ्या एकूण १० हजार ३०९ उमेदवारांपैकी सर्वाधिक ३ हजार ७८ उमेदवार हे कोकण विभागातील असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील उमेदवार अनुकंपा तत्वावरील २५७ तर लोकसेवा आयोगामार्फत नियुक्त झालेले २७३ उमेदवार आहेत. विदर्भातील उमेदवार २ हजार ५९७ आहेत. पुणे विभागात १ हजार ६७४, नाशिक विभागात १ हजार २५०, तर मराठवाड्यातील १ हजार ७१० उमेदवार आहेत.

## बेकायदा होर्डिंग्जच्या प्रश्नावरून उच्च न्यायालयाचा संताप

### तक्रारी वेळीच सोडवल्या नाहीत, तर अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

बेकायदा होर्डिंग्जच्या समस्येवरून उच्च न्यायालयाने शुक्रवारी मुंबई महापालिकेला निवार्णीचा इशारा दिला. बेकायदा होर्डिंग्जचा प्रश्न सोडवण्यात पालिका प्रशासन सपशेल अपयशी ठरले असून जर होर्डिंग्जविरोधातील तक्रारी वेळेत सोडवल्या गेल्या नाहीत तर महापालिका अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीचे आदेश देऊ, असा सज्जड दम न्यायालयाने पालिकेला दिला. येत्या १५ दिवसांतच अशा प्रकारे आदेश देऊ, असेही न्यायालयाने ठणकावले.

राज्यभरातील बेकायदा होर्डिंग्जला आळा घालण्यासाठी सरकार व पालिका प्रशासनांना सक्त निर्देश द्या, अशी विनंती करणाऱ्या विविध याचिका उच्च न्यायालयात दाखल आहेत. या याचिकांवर शुक्रवारी न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. यावेळी राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली. त्यांनी बेकायदेशीर होर्डिंग्ज आणि बॅनरच्या समस्येला आळा घालण्यासाठी विविध सूचना सादर केल्या.



राजकीय पक्षांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या योग्य परवानगीशिवाय कोणतेही बॅनर वा होर्डिंग्ज लावले जाणार नाहीत, अशी हमी देणारे प्रतिज्ञापत्र उच्च न्यायालयात सादर करणे आवश्यक आहे. न्यायालयाने राजकीय पक्षांना सर्वाधिक उल्लंघन करणारे असल्याचे निरीक्षण नोंदवल्यानंतर याचिकांमध्ये सर्व राजकीय पक्षांना पक्षकार बनवण्यात आले आहे. न्यायालयाच्या निर्देशाला अनुसरून राजकीय पक्षांना एका महिन्याच्या आत प्रतिज्ञापत्र दाखल करावे लागणार आहे. बेकायदा होर्डिंग्ज नियंत्रणासंबंधी न्यायालयाच्या आदेशाचे पालन कसे केले जाईल आणि त्यावर देखरेख करण्यासाठी त्यांच्या पक्षातील जबाबदार व्यक्तीची ओळख कशी करावी हे स्पष्ट करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने राजकीय पक्षांना दिले आहेत.

**मुंबईत वॉर्डनिहाय वरिष्ठ परवाना निरीक्षक जबाबदार**

मुंबई शहरात प्रत्येक वॉर्डमध्ये वरिष्ठ परवाना निरीक्षकांची बेकायदेशीर बॅनर आणि होर्डिंग्ज काढून टाकण्याची जबाबदारी असेल. त्यांनी वैधानिक तरतुदी आणि न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार प्रभागस्तरीय नोडल अधिकारी म्हणून काम करावे, अशी सूचना राज्य सरकारने न्यायालयात केली आहे. तसेच इतर महापालिका, नगरपरिषदा आणि जिल्हा परिषदांनीदेखील नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करावी, असेही सरकारने म्हटले आहे. सरकारच्या विविध सूचनांची खंडपीठाने गंभीर दखल घेतली. जर नोडल अधिकारी त्यांचे कर्तव्य बजावत नसतील, तर यंत्रणा काय आहे? जर अधिकाऱ्याच्या कर्तव्यात निष्काळजीपणा आढळला तर त्याची विभागीय चौकशी झाली पाहिजे, असे खंडपीठाने बजावले आणि पुढील सुनावणी १५ ऑक्टोबर रोजी निश्चित केली.

## थायलंड-म्यानमार सायबर गुलामगिरी रॅकेटचा भंडाफोड

### भारतीय तरुणांची फसवणूक करून मानवी तस्करी

■ **मिरा-भाईंदर। प्रतिनिधी,**

भारतीय तरुणांना थायलंड व म्यानमार या देशांमध्ये सायबर गुलामगिरी करीता पाठविणाऱ्या आंतरराष्ट्रीय रॅकेटचा पदार्पाश करण्यात गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-१, काशिमीरा यांना यश. अधिक माहितीनुसार मिरा-भाईंदर शहरातील काही इसमांना थायलंड येथे फेसबुक कंपनीमध्ये चांगल्या पगाराची नोकरीवर लावण्याचे आमिष दाखवून नयानगर परिसरात राहणारे इसम सय्यद इरतिझा हुसैन व अम्मार लकडावाला यांना ऑगस्ट, २०२५ मध्ये हैदरी चौक, नयानगर परिसरात राहणारा इसम आसिफ खान ऊर्फ नेपाळी याने म्यानमार देशात असलेला त्याचा साथिदार अदनान शेख याच्या मदतीने नमूद दोन्ही इसमांची भरती करून त्यांना थायलंड येथे पाठवून त्यानंतर त्यांना थायलंड मधील इतर साथीदारांच्या मदतीने बेकायदेशीरपणे म्यानमार या देशात सायबर गुलामगिरीकरीता मानवी तस्करी करून पाठविल्याबाबत गोपनिय बातमीदारांमार्फत गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-१ यांना माहिती मिळाली होती.

सदर माहितीवरून नमूद पीडित इसमांशी संपर्क साधला असता त्यांनी वरीलप्रमाणे हकिकत सांगून त्यांच्याकडून म्यानमार या देशातील ववर या सायबर फ्रॉड करणाऱ्या कंपनीमध्ये लिओ या चिनी वंशाच्या व स्टिव्ह आण्णा या भारतीय इसमाने त्यांना भारतीय मुलींच्या नावाने फेसबुकवर खाते उघडून परदेशातील भारतीय लोकांशी फ्रेंडशिप करून त्यांचा व्हाटस्अप नंबर मिळवायचा व त्यानंतर त्यांना विश्वासात घेवून क्रिप्टोकरन्सी व बिटकॉईनमध्ये इन्व्हेस्ट करायला सांगून त्यांची फसवणूक करण्याचे काम करण्याचे प्रशिक्षण देवून सदर काम करण्यास भाग पाडले. तसेच, फियार्दी व साक्षिदार यांना सदर कंपनीच्या इमारतीच्या बाहेर जाण्यास अटकाव करून त्यांनी काम न केल्यास त्यांचा शारिरीक छळ केला आहे. तसेच, सदर त्रासातून सुटका करून घेण्यासाठी यातील आरोपी यांनी फियार्दी व साक्षिदार यांच्याकडून प्रत्येकी ७,०००/- अमेरीकन डॉलर्स (भारतीय चलनातील रू. ६ लाख) खंडणी ५ भारतीय बँक खात्यांवर स्विकारली आहे. तसेच, खंडणीची रक्कम जमा झाल्यानंतर त्यांची म्यानमार देशातून मुक्तता केली, अशा फियार्दी यांनी दिलेल्या तक्रारीवरून नयानगर पोलीस ठाणे येथे एकूण ८ आरोपीं विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-१ यांनी एजंट आसिफ खान ऊर्फ नेपाळी यास नयानगर येथून अटक करण्यात आली आहे. तसेच, सदर खंडणीची रक्कम स्विकारणाऱ्या इसमांपैकी आरोपी रोहीत कुमार मरडाणा, रा. विशाखापट्टणम, आंध्र प्रदेश यास सुरत येथून अटक करण्यात आलेली असून त्याने सदरची रक्कम पुढे कुठे पाठविली याबाबतचा अधिक तपास मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त सो., मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो., मा. श्री. संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त सो. गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो., प्रकटीकरण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा येथील प्रभारी पोनि. सुशिलकुमार शिंदे, सपोनि /सचिन सानप, पोउपनिरी / उमेश भागवत, सफौ/अशोक पाटील, संजय शिंदे, पुष्पेंद्र थापा, पो.हवा / मनोज चव्हाण, सचिन हुले, स्वप्निल मोहिले, प्रशांत विसपुते, पो.अं / गौरव बारी व धिरज मेंगाणे यांनी केली आहे.

## खून करून पलायन केलेल्या गुन्हेगारास पोलिसांनी परराज्यातून केली अटक

■ **नायगाव। प्रतिनिधी,**

नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी खुन करुन पळुन गेलेल्या आरोपीस ओका, व्दारका बंदर राज्य गुजरात येथील जहाजातुन केली अटक . अधिक माहितीनुसार नायगाव पोलीस ठाणे हद्दीतील सेनरजी हायजील कंपनी, कामण, वसई पूर्व, येथे काम करणारे कामगार दिलीप सरोज (मयत व सुनिल प्रजापती (आरोपी) यांना कंपनीचे मालक फियार्दी प्रकाश मुंकर चामरिया यांनी दिनांक ०७/०९/२०२५ रोजी दोघांच्या जेवणाच्या खचार्साठी एकत्रित रक्कम आरोपी सुनिल प्रजापती याच्या बँक खात्यात दिली होते. परंतु आरोपी सुनिल याने नमुदची रक्कम यातील मयत दिलीप सरोज यांस दिली नाही. सदर कारणावरुन त्यांच्या दोघांमध्ये वाद होवून सुनील प्रजापती याने दिलीप सरोज यास कोणत्या तरी साधनाने डोक्यास उजव्या व मागील बाजूस, दोन्ही डोळ्यांवरती, व उजव्या हातास गंभीर दुखापत केल्याने नायगाव पोलीस ठाणे येथे फियार्दी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील जखमी इसम दिलीप सरोज यांच्यावर उपचार चालु असताना मयत झाल्याने गुन्हयात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३ (१) प्रमाणे वाढीव कलम लावण्यात आले आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. वरिष्ठांच्या आदेशाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांचे दोन वेगवेगळे पथके बनवून आरोपी याचा शोध घेण्यास सुरुवात केली. तपासा दरम्यान कौशल्यपूर्ण तपास करुन तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे गुन्हयातील आरोपी हा ओका, व्दारका बंदर, राज्य गुजरात येथील जहाजात आपले अस्तित्व लपवुन राहत असल्याबाबत निष्पन्न झाले. ओका बंदर, राज्य गुजरात येथील बंदरा लगत असणाऱ्या सुमारे २०० पेक्षा जास्त जहाजांची तपासणी करुन गुन्ह्यातील आरोपीसुनील खरपत प्रजापती, वय ३५ वर्षे, सध्या राहणार गाळा नंबर १४, सना इस्टेड, पंजाब ढाबाचे समोर, डोंगरीपाडा, कामण, ता. वसई जि. पालघर, मुळ राहणार- बडी कमरिया, काली मंदिराजवळ, जि. शहदतपुरी राज्य उत्तरप्रदेश यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने कौशल्यपूर्ण तपास केला असता त्याने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी सुनिल प्रजापती यास अटक करून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोनि/ अभिजीत मडके हे करीत आहेत.

वरील कामगीरी मा.श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा.श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा.श्रीमती पौणिमा चौगुले, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ २ वसई, मा.श्री. नवनाथ घोगरे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे. वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अभिजीत मडके यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/गणेश केकान, पोउपनिरी/ज्ञानेश्वर आसबे, अनिल मोरे, सफी/बाबाजी चव्हाण, पोहवा/शेखर पवार, सचिन ओलेकर, सचिन मोहीते, पो.अंम. सचिन खंताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील, पांडुरंग महाले, पोहवा/बाळासाहेब भालेराव, पोहवा/ अमोल बरडे नेमणुक पो.उप आयुक्त सौो परिमंडळ नं ०२, वसई यांनी यशस्वीरित्या कामगिरी पार पाडली आहे.

## सुमारे १,०६,२८,०००/- रु. किमतीचा अंमली पदार्थ व इतर ऐवज ६ गुन्हेगारांकडून पोलिसांनी केला जप्त

■ **भाईंदर। प्रतिनिधी,**

मिरा-भाईंदर- ६ ईसमांकडुन ५०१.६ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन (एम. डी.) अंमली पदार्थ व इतर असा १,०६,२८,०००/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त अंमली पदार्थ विरोधी कक्ष-१ यांची कारवाई.

अधिक माहितीनुसार दिनांक ०४/०७/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक कक्ष ०१ चे पथक गस्त करीत असताना वेस्टर्न हॉटेल ते कनकिया कडे जाणाऱ्या मिरा-भाईंदर लिंक रोड वर स्केअर बिल्डींग समोर ०६ इसमांच्या संशयितरित्या हालचाली दिसुन आल्याने दोन पंचांसमक्ष त्यांची अंगझडती घेण्यात आली. त्यांचेकडुन ५०१.६ ग्रॅम वजनाचा रुपये १,००,३२,०००/- किं.चा मॅफेड्रॉन (एम.डी.) तसेच अंमली पदार्थ व्यवसायाकरिता वापरलेले ८ मोबाईल, ४ मोटारसायकल असा एकूण १,०६,२८,०००/- रुपये किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर बाबत काशिगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला असुन सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा तपास अंमली पदार्थ विरोधी पथक कक्ष ०१ मार्फत करण्यात येत आहे.

सदरची कारवाई मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्ष १ चे पथकामार्फत करण्यात आली आहे.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## सोनम आणि सरकार



**सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण सुधारक आणि पर्यावरणवादी म्हणून ओळख असलेल्या सोनम वांगचुक यांना हिंसक आंदोलनानंतर राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप होत आहे.**

सन २००९चा हा काळ. 'थ्री इडियट्स' बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत होता. बोमन इराणीचा वीरू सहस्त्रबुद्धे, ओमी वैद्य यांनी चतुर रामालिंगम म्हणजे सायलेंसरची भूमिका साकारून धमाल उडवून दिली होती. यावेळी सर्वात लक्षात राहिला तो आमिर खानने साकारलेला 'रणछोडदास शामलदास छांछड' उर्फ रँचो उर्फ फुनसुख वांगडू हे पात्र आणि लढाखमधील डोंगररांगांमधील प्रयोगशील शाळेचा शेवटचा सीन... इथेच प्रेक्षकांना रँचो उर्फ फुनसुख वांगडू म्हणजेच 'सोनम वांगचुक' यांची पहिली ओळख झाली. त्यानंतर दीड दशक सोनम वांगचुक विविध रूपात, विविध भूमिका घेत भारतीयांसमोर येत राहिले. आता सरकारने राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली त्यांना अटक केली असून, देशातील एक विशिष्ट वर्ग त्यांना देशद्रोही ठरवण्यासाठी शक्ती पणाला लावत आहे. त्यामुळे खरा सोनम कोण याचा चेहरा देशासमोर आला पाहिजे. सोनम वांगचुक यांची ओळख सामाजिक कार्यकर्ते, प्रयोगशील शिक्षक, शिक्षण सुधारक आणि पर्यावरणवादी अशी आहे. १९८८मध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, श्रीनगर येथून त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये बीटेक पूर्ण केले. सन १९७५मध्ये त्यांचे वडील जम्मू-काश्मीर सरकारमध्ये मंत्रीही होते. सोनम हे 'स्टुडंट्स एज्युकेशनल अँड कल्चरल मूव्हमेंट ऑफ लडाख'चे संस्थापक आहेत. सौरऊर्जेचा वापर प्रकाश आणि उष्णतेसाठी, जीवाश्म इंधनाऐवजी पर्याय वापरणारे, अशा प्रकारचे कॅम्पस डिझाइन करण्यासाठी ते विशेष ओळखले जातात. पुढे त्यांनी शैक्षणिक सुधारणा करण्यासाठी आणि उच्च शिक्षणात अत्यावश्यक कौशल्य निर्माण करून शाश्वत भविष्य निर्माण करण्यासाठी 'हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ह लडाख'ची स्थापना केली. याद्वारे नवनवीन प्रयोग राबवले. १९९४ मध्ये सरकारी शाळा व्यवस्था सुधारण्यासाठी सरकार, ग्रामीण समुदाय आणि नागरी समाजाच्या सहकार्याने 'ऑपरेशन न्यू होप' सुरू करण्याचे श्रेय सोनम वांगचुक यांना जाते. जानेवारी २०१४ मध्ये वांगचुक यांनी बर्फ स्तूप नावाचा एक प्रकल्प सुरू ज्याद्वारे एप्रिल-मे महिन्यांत नैसर्गिक हिमनदी वितळण्याचे पाणी वाहू लागण्यापूर्वी लडाखमधील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या पाण्याच्या संकटावर उपाय शोधणे होते. २०१६ मध्ये त्यांनी फार्मस्टेज लडाख नावाचा एक प्रकल्प सुरू केला, जो पर्यटकांना लडाखमधील स्थानिक कुटुंबांसोबत राहण्याची सुविधा देतो. सोनम वांगचुक आणि त्यांच्या टीमने युरोपातील पहिला बर्फाचा स्तूप बांधला. सन २०२१ मध्ये सोनम यांनी भारतीय सैन्यासाठी सौरऊर्जेवर चालणारे तंबू विकसित केले. असे नावीण्यपूर्ण एक ना अनेक प्रयोग केले. या अमूल्य योगदानाबद्दल त्यांना देशविदेशात अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. ज्यात सन २०१८ साली रॅमन मॅगसेसे पुरस्कार, हिमालयीन प्रदेशातील प्रख्यात तंत्रज्ञ पदवी आणि शाश्वत वास्तुकलासाठी जागतिक पुरस्कार यांचा समावेश आहे. तब्बल ६०,००० चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेला लडाख हा प्रांत पर्वतराजीने नटलेला नितांतसुंदर नैसर्गिक प्रदेश आहे. लडाखच्या सीमा चीनशी जोडल्या असल्याने प्रादेशिक व राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही हा प्रांत अत्यंत महत्त्वाचा आहे. लडाख याआधी जम्मू-काश्मीर राज्याचा भाग होता. पण ५ ऑगस्ट २०१९ साली केंद्र सरकारने राज्यघटनेतील कलम ३७० व ३५ (अ) हटवून जम्मू-काश्मीरला मिळालेला विशेष राज्याचा दर्जा संपवला. तसेच जम्मू-काश्मीरचे द्विविभाजन करून जम्मू-काश्मीर आणि लडाख अशी दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती केली. कलम ३७० रद्द करण्यापूर्वी लडाखमधून जम्मू-काश्मीरच्या विधानसभेत चार व विधानपरिषदेत दोन आमदार निवडून जायचे तर दोन खासदार निवडून जात होते. लडाख केंद्रशासित झाल्यामुळे तेथील नायब राज्यपालाच्या अखत्यारित केंद्राचा कारभार आला. लोकनियुक्त प्रतिनिधित्व संपले आणि केवळ एक खासदार या प्रदेशातून निवडून येऊ लागला. कलम ३७० हटवताना केंद्राने दिलेली आश्वासनेही पाळली नाहीत, असे लडाखवासीयांचे म्हणणे आहे.

१) लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात यावा.

२) राज्यघटनेचे सहावे परिशिष्ट लागू करण्यात यावे. (या सहाव्या परिशिष्टानुसार आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मणिपूर या राज्यांना विशेष तरतुदी लागू आहेत. यानुसार त्यांना स्वायत्त जिल्हा परिषद स्थापन करता येते, प्रादेशिक परिषद स्थापन करता येते. आदिवासी भागांमध्ये स्थानिक कायदे, जमीन वापर वनक्षेत्र आणि जमावबंदीसंबंधित बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी या परिषदांना अधिकार प्राप्त होतो. तसेच स्थानिक पातळीवर कायदे बनवण्याचा व अंमलबजावणी करण्याचा अधिकार प्राप्त होतो. ज्यामुळे त्या विशिष्ट प्रदेशाच्या गरजा आणि परंपरांचे जतन होण्यास मदत होते.)

३) लडाखमध्ये लोकसभेची आणखी एक जागा वाढवण्यात यावी.

४) तसेच लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात यावी. या मागण्यांसाठी लडाखमधील ॲपेक्स बॉडी लेह, कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्स यांच्यासह अनेक सामाजिक-राजकीय संघटना आंदोलन करत आहेत. या आंदोलनाचा प्रमुख चेहरा आहे तो सोनम वांगचुक! या मागण्यांसाठी फेब्रुवारी २०२४ साली लडाखमध्ये बंद पाळण्यात आला. हजारो लोक रस्त्यावर उतरले होते. ६ मार्च रोजीही लेखमध्ये कडाक्याच्या थंडीत व शून्य तापमानात शेकडो नागरिकांसह सोनम वांगचुक यांनी तब्बल २१ दिवस उपोषण केले होते. १ सप्टेंबर रोजी चलो दिल्ली पदयात्रा काढत शेकडो आंदोलकांसह दिल्लीच्या दिशेने प्रयाण केले. मात्र या आंदोलकांना दिल्लीतील वाघा बॉर्डरवर अडवण्यात आले. अशा प्रकारे लेह-लडाख प्रांत आपल्या मागण्यांसाठी शांततामय मार्गाने आंदोलन करत होता.

याच मागण्यांसाठी गेल्या १५ दिवसांपासून सोनम उपोषणाला बसले होते. पण सरकार पूर्ण राज्याच्या मागणीची दखल घेत नसल्यामुळे लडाखमधील हजारो तरुण रस्त्यावर उतरले. दि. २४ सप्टेंबर रोजी लेह-लडाखमध्ये झालेल्या हिंसाचारात जमावाने भाजपचे कार्यालय जाळून आपला संताप व्यक्त केला. यावेळी सुरक्षा दलाच्या गोळीबारात चार जणांचा मृत्यू झाला, तर पोलिसांसह ६०हून अधिक लोक जखमी झाले. या हिंसाचारप्रकरणी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत सोनम वांगचुक यांना अटक करण्यात आली असून, त्यांना राजस्थानमधील जोधपूरमध्ये ठेवण्यात आले आहे. त्यांच्यावर प्रक्षोभक भाषणं व जमावाला चिथावणी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. स्टुडंट्स एज्युकेशनल अँड कल्चरल मूव्हमेंट ऑफ लडाख या संस्थेचा परकीय निधीचा परवाना रद्द करण्यात आला असून, त्यांच्या संस्थेला दिलेली जमीन सरकारने परत घेतली आहे, तर त्यांच्या स्वयंसेवी संस्थेला मिळालेल्या देणग्यांची व त्यांच्या संपत्तीची सीबीआय आणि इन्कम टॅक्सच्या माध्यमातून चौकशी सुरू आहे. तसेच त्यांनी भेट दिलेल्या पाकिस्तान व चीनच्या दौऱ्यांचीही चौकशी सुरू आहे. पाकिस्तानमध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या हवामानबदलासंदभार्तील एका परिषदेसाठी सोनम आपल्या पत्नीसह पाकिस्तानला गेले होते. अनेक राष्ट्रांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. त्यामुळेच पाकिस्तानला गेले म्हणून षडयंत्र रचणे, आयएसआयशी संबंध आहेत असा आरोप करणे हे पूर्णपणे खोटे आरोप असून, बदनामीचे षडयंत्र आहे, असे त्यांची पत्नी गीतांजली यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले आहे. सोनम वांगचुक हा आता राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विषय बनला आहे. त्यानिमित्ताने लेह-लडाखवासीयांचे प्रश्नही केंद्रस्थानी आले आहेत. जगभरातील प्रसारमाध्यमे, सामाजिक संस्था, न्यायसंस्था, आंतरराष्ट्रीय संस्था, सरकारे सोनम प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत. भारतावर सांप्रदायिकतावादाचा डाग लागला आहे. जगभरात याचे पडसाद उमटत आहेत. नजीकच्या काळातील घडामोडी पाहता भारताचे परराष्ट्र धोरण फसले आहे, याची खात्री पटते. ७० वर्षांत राष्ट्र म्हणून आपण जे कमावले त्याची माती व्हायला नको. तपास यंत्रणेचा, न्यायसंस्थेचा आता कस लागणार आहे. केवळ सूडबुद्धीने कारवाई केल्यास सरकारवर, न्यायव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह येता कामा नये. नाहीतर सोनमच्या रूपाने सरकारने आपल्या राजसत्तेवर आणि लोकशाहीवर शेवटची पाचर मारली आहे, असे व्हायला नको.



## सेमिकंडक्टर चिप निर्मितीतला स्वदेशी विक्रम!

काही दिवसांपूर्वीच नवी दिल्लीत सेमिकॉन इंडिया २.० संमेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं. या संमेलनात केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हाती विक्रम-३२ बिट प्रोसेसर आणि इतर ४ मंजूर प्रकल्पांच्या चाचणी चिप्स सुपूर्द केल्या. स्वदेशी सेमिकंडक्टर चिप्स निर्मितीत हा क्षण मैलाचा दगड ठरलाय. २०३० पर्यंत ९ लाख कोटींची सेमिकंडक्टर चिप उत्पादन आणि ग्लोबल मार्केटमध्ये १० टक्के वाटा तयार करण्याचं भारताचं लक्ष्य आहे. हे लक्ष्य साध्य केल्यास भारताच्या हातातला हा डिजिटल हिरा मोठ्या दिमाखात चमकताना दिसेल.

अनेकांना कदाचित आठवत असेल की कोरोना-१९ काळात काही इलेट्रॉनिक उपकरणं महागली होती, ऑटोमोबाईल इंडस्ट्री ठप्प झाली होती आणि स्मार्टफोन्सचे प्रॉडक्ट लॉन्चही रखडले होते. हे सर्वकाही सेमिकंडक्टर चिप्सचं उत्पादन थंडावल्यामुळं झालं होतं. आपल्या घरातला टीव्ही, फ्रिज, होम अप्लायन्सेस, दुचाकी-चारचाकी, स्मार्टफोन्स, कम्प्युटर्स, लॅपटॉप असोत किंवा सुरक्षा व अवकाश उपकरणं असोत सर्वकाही सेमिकंडक्टर चिप्सवर चालतात. एवढंच काय तर ही इलेक्ट्रॉनिक उपकरणं खरेदी करण्यासाठी आपण ज्या डेबिट/क्रेडिट कार्डाचा वापर करतो, ते कार्डही एका चिपवरच चालतं. या चिप्सना प्रोसेसर असंही म्हटलं जातं. या चिप्स इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा मेंदू म्हणून काम करतात.

एकावेळेला ३२ बिट डेटा प्रोसेस करण्याची क्षमता असलेली विक्रम ३२ बिट चिप ही भारताची पहिली स्वदेशी सेमिकंडक्टर चिप. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्त्रो) मोहालीतील सेमिकंडक्टर लॅबमध्ये संरक्षण आणि एअरोस्पेस उपकरणांना डोळ्यापुढं ठेवून या प्रोसेसरचं डिझाईन करण्यात आलंय. हा प्रोसेसर विक्रम १६०१ चं ॲडव्हान्स व्हर्जन आहे. इस्त्रोच्या वेगवेगळ्या रॉकेटमध्ये २००९ पासून हा प्रोसेसर वापरला जात होता. याचं पहिलं व्हर्जन १६ बिट एवढं होतं, तर आताचं ॲडव्हान्स व्हर्जन त्याच्या दुप्पट आहे. रॉकेटचं नॅव्हिगेशन, कंट्रोल आणि मिशन मॅनेजमेंटला सांभाळण्यास सक्षम असा हा प्रोसेसर आहे. या प्रोसेसरनं भविष्यात सुरक्षा, ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये वापरता येईल, असे प्रोसेसर भारतही बनवू शकतो हा विश्वास आपल्याला दिलाय. पण, सध्यातरी १८० नॅनो मीटर आकाराचा विक्रम प्रोसेसर मोबाईल-लॅपटॉपमध्ये लावण्यात येणाऱ्या ६ नॅनो मीटर क्षमतेचा नाहीय, हे आधी समजून घेतलं पाहिजे. आताच्या घडीला महत्त्वाचं म्हणजे अतिशय कॉम्प्लेक्स डिझाईन आणि मॅन्युफॅक्चरिंगचं आव्हान झेलून भारतानं हा स्वदेशी प्रोसेसर बनवलाय म्हणूनच तो खास आहे.

आजघडीला काही ठराविक देशांमध्ये उत्पादित होणाऱ्या कच्च्या तेलाचं प्रमाण आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील त्यांच्या किमतीवरून ग्लोबल इकॉनॉमी वरखाली होत असते. कच्च्या तेलावरून जागतिक भू राजकीय दशादिशा ठरत असल्यानं कच्च्या तेलाला काळं सोनं असंही म्हटलं जातं. पण, नव्या जमान्यात सेमिकंडक्टर चिप्सना डिजिटल डायमंड म्हटलं जातंय. पंतप्रधान मोदींनी याचा उल्लेख केलाय. कारण ही चिप दिसायला भलेही छोटी दिसत असली, तरी जगाच्या प्रगतीला गती देण्याची प्रचंड शक्ती छोट्याशा चिपमध्ये सामावलीय. भविष्यात भू राजकीय बदल घडवण्याची अफाट क्षमता या सेमिकंडक्टर चिपमध्ये आहे. त्यामुळं अनेक देश या नव्या तंत्रज्ञानाची कौशल्यं आत्मसात करण्याच्या प्रयत्नात आहेत. भारतही उशिरानं का होईना या शर्यतीय उतरलाय. कारण सद्यस्थितीत काही ठराविक देशांचीच या क्षेत्रात मक्तेदारी तयार झालीय. ती कशी ते बघणं महत्त्वाचं आहे.

करंगळीएवढ्या आकाराचा प्रोसेसर बनवण्याचं तंत्रज्ञानही तेवढंच कॉम्प्लेक्स अर्थात गुंतागुंतीचं असतं. ही चिप किंवा प्रोसेसर बनवण्याची सुरुवात सिलिकॉन वेफर्सपासून होते. या वेफर्सवर विद्युत प्रवाह (करंट) वाहून नेणारे लाखो ट्रान्झिस्टर्स लावून आधी सर्किट बनवलं जातं. आधुनिक चिप्सवर तर कोट्यवधी ट्रान्झिस्टर्स लावलेले असतात. या किचकट प्रक्रियेसाठी अतिशय उच्च दर्जाची अचूकता लागते. जसजशी टेक्नॉलॉजी विकसित होतेय तसतसा चिप्सचा आकार कमी होत ३ नॅनोमीटरपर्यंत येऊन पोहोचयलाय. जेवढी चिप लहान तेवढी ट्रान्झिस्टर्सची घनता (डेन्सिटी) जास्त. कमी आकाराच्या या चिप्स कमी ऊर्जेत फास्ट करण्यात पटाईत असतात.

चिप्समध्येही मॅच्युअर नोड्स आणि ॲडव्हान्स नोड्स असे दोन प्रकार असतात. सिंगल डिजिट नॅनोमीटरच्या चिप्सला ॲडव्हान्स नोड्स आणि डबल डिजिट किंवा २८ नॅनोमीटर आकारावरील चिप्सना मॅच्युअर नोड्स म्हटलं जातं. छोट्या आकाराच्या ॲडव्हान्स नोड्स चिप्स स्मार्टफोन्स, एआय, ब्लॉकचेन, मशिन लर्निंगसाठी वापरल्या जातात, तर मॅच्युअर नोड्स चिप्स ऑटोमोबाईल इंडस्ट्री, कन्ज्युमर गुड्स, एव्हिएशन, मेडिकल डिव्हायसेस आणि मिलिट्री उपकरणांमध्ये वापरल्या जातात. या चिप्स ॲडव्हान्स चिप्सच्या तुलनेत थोड्या स्वस्तही असतात. आपला विक्रम ३२ बिट प्रोसेसर मॅच्युअर नोड्स प्रकारातला.

हे झालं हार्डवेअरचं. चिप बनवण्याची सुरुवात होते ती डिझायनिंगपासून. सर्वात आधी चिपचं ब्ल्यूप्रिंट बनवलं जातं. यामध्ये कंपन्या चिपचं आर्किटेक्चर ठरवतात. या चिपचा वापर कुठल्या उपकरणात केला जातोय यावरून चिपमध्ये किती ट्रान्झिस्टर्स लागतील, ते कसं काम करतील, हे ठरवलं जातं. उदा. एखादा स्मार्टफोन चांगली फोटोग्राफी करणारा हवा असल्यास तसं चिपचं डिझायनिंग होतं, एखादी चिप गेमिंग किंवा एआयच्या वापरानुसार डिझाईन केली जाते. डिझायनिंगमध्येही चिप डिझायनिंगचं फक्त सॉफ्टवेअर्स पुरवणाऱ्या, सॉफ्टवेअर्स व लायसन्स देणाऱ्या आणि फॅबलेस अशा ३ प्रकारच्या कंपन्या असतात.

सॉफ्टवेअर्स डिझायनिंगला इलेक्ट्रॉनिक डिझायनिंग ॲटोमेशन (ईडीए टुल्स) असंही म्हटलं जातं. ईडीए टुल्सशिवाय उच्च क्षमतेच्या चिप डिझाईन करणं अशक्य आहे. या ईडीए टुल्समध्ये अमेरिकन कंपन्यांचा मोठा दबदबा आहे. २०२१ मध्ये ईडीएचं ग्लोबल मार्केट ७० हजार कोटी रुपयांचं होतं. त्यात अमेरिकेच्या फक्त ३ कंपन्यांकडं (केडन, सायनॉप्सिस, मेंटर ग्राफीक्स) ७० टक्क्यांहून अधिक वाटा होता. काही कंपन्या चिपचं डिझायनिंग करून त्याचे इंटेलेक्च्युअल राईट्स स्वतःकडं ठेवून हे डिझाईन वापरण्याचं इतर कंपन्यांना लायसन्स देतात. उदा. युकेची एआरएम लि. ही कंपनी, जी चिपचं डिझायनिंग करून ते लायसन्सनं ॲपलला देते. या एकट्या कंपनीचं वार्षिक उत्पन्न ३५ हजार कोटींहून जास्त आहे.

चिप डिझाईन-लायसनिंगचं मार्केट २०२१ मध्ये ४४ हजार कोटींचं होतं. त्यात यूएस आणि युकेच्या कंपन्यांचा वाटा तब्बल ९० टक्क्यांचा होता. तिसऱ्या श्रेणीत क्वालकॉम, मीडियाटेक, ॲपल, एएमडी, ॲपल, एनव्हिडिया अशा फॅबलेस कंपन्या येतात. या कंपन्या एआरएमसारख्या कंपन्यांकडून आधी चिप आर्किटेक्चर लायसन्स विकत घेतात आणि त्यात आपल्या डिव्हाईसच्या गरजेनुसार काही प्रोप्रायटरी बदल करून वर उल्लेख केल्याप्रमाणं फॅब कंपन्यांकडून आऊटसोर्सिंगनं चिप बनवून घेतात. चिपचं उत्पादन फॅब किंवा फाउंड्रीजमध्ये केलं जातं. तसं बघायला गेलं तर यूएस, युके, युरोपीयन देशातही चिप बनतात. पण, तैवान, दक्षिण कोरिया, चीन या देशांकडं असलेली एक्स्पर्टीज इतर देशांकडं नाही. त्यातही तैवानमध्ये जगातल्या ७० टक्क्यांहून अधिक चिप्स बनतात.

जगभरातील ॲडव्हान्स लेव्हलच्या ९० टक्क्यांहून अधिक चिप्स तर तैवान सेमिकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि. (टीएसएमसी) ही एकटी कंपनीच बनवते. यातही गमतीची बाब म्हणजे चिप डिझायनिंगमध्ये जसा अमेरिकेचा हातखंडा आहे तसाच तो चिप उत्पादनासाठी फाउंड्रीजमध्ये लागणाऱ्या हायटेक मशीन्स बनवण्यातही आहे. यूएससह जपान, नेदरलँड, चीन, तायवानी कंपन्याही या क्षेत्रात आहेत. नेदरलँडच्या एएसएमएल नावाच्या एका कंपनीची तर लेटेस्ट जनरेशन फोटोलिथोग्राफी स्कॅनर इक्युपमेंट बनवण्यात अक्षरशः मोनॉपॉली आहे.

चिपचं उत्पादन झाल्यावर त्यांचं असेंब्लिंग, टेस्टिंग आणि पॅकेजिंग (एटीपी) हे देखील महत्त्वाचे टप्पे असतात. एखादी चिप डिव्हाईसमध्ये बसवण्याआधी तिचं टेस्टिंग होतं. या क्षेत्रात आऊटसोर्स सेमिकंडक्टर असेंब्लिंग अँड टेस्टिंग (ओसॅट) कंपन्या काम करतात. यातील ९० टक्क्यांहून अधिक कंपन्या सिंगापूर, तैवान आणि चीनमध्येच आहेत. सेमिकंडक्टरसाठी जी काही रेअर अर्थ मटेरियल लागतात, ती काढून त्यावर प्रक्रिया करून ती पुरवण्यात ९० टक्क्यांहून अधिक वाटा चीनचा आहे.

त्रयस्त नजरेनं बघितल्यास काही ठराविक देशांचीच या क्षेत्रात मोनॉपॉली दिसते. आधुनिक जमान्यात एखाद्या देशावर सैन्य कारवाई किंवा आर्थिक कोंडी करण्याहूनही माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेची सूत्रं हातात ठेवणं भू-राजकीयदृष्ट्या महत्त्वाचं मानलं जातंय. अमेरिकेला उगीचच महासत्ता म्हटलं जात नाही. केवळ सैन्यबळच नाही, तर अमेरिकेनं तंत्रज्ञानाची सूत्रंही याच तऱ्हेनं आपल्या हातात ठेवलीय अन् चीन त्यांना टक्कर देतोय. उद्या समजा अमेरिकेनं जगभरातलं जी-मेल, यूट्युब किंवा इतर सोशल साईट्स बंद केली, आयओएस-अँड्रॉईडवर चालणारे स्मार्टफोन स्लो केले तर काय होईल? याचप्रकारे सेमिकंडक्टर डिझाईनची इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी किंवा सॉफ्टवेअर लायसन्स कुणाला दिलंच नाही, चीननं रेअर अर्थ मटेरियलचा पुरवठा बंद केला किंवा भू-राजकीय वादातून उद्या तैवानवरच कब्जा केला तर काय होईल? याचाही अंदाज करणं कठीण आहे. सेमिकंडक्टर चिपवर चालणाऱ्या प्रत्येक डिव्हाईसच्या चाव्या या दोन देशांच्या हातात येतील.

भारताच्या सेमिकंडक्टर प्रवासाची गाथा खरी तर 1984 साली (टीएसएमसीपेक्षाही आधी) मोहालीतल्या त्याच लॅबमध्ये सुरू झाली होती जिथं विक्रम ३२ बिट विकसित झालाय. पण, १९८९ मध्ये या लॅबला आग लागली, केंद्रीय धोरणं बदलत गेली, तसे सगळे संकल्पही मोडीत निघाले. जपान-चीनमध्येही तैवानच्या आधी सेमिकंडक्टरवर काम सुरू झालं होतं. तिथंही सरकारी धोरणं आणि उत्पादन खर्च आवाक्याबाहेर गेल्यानं हे देश चिप निर्मितीत मागं पडले. मागच्या ३० ते ४० वर्षांत तैवाननं प्रचंड रिसर्च अँड डेव्हलपमेंटच्या जोरावर सेमिकंडक्टर चिप उत्पादनात यश गाठलं. ताज्या अहवालानुसार, जगभरात सेमिकंडक्टरचं मार्केट ५२ लाख कोटी रुपयांचं आहे.

२०३० पर्यंत हे मार्केट वाढून ८० लाख कोटींपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. यात सध्या भारताचं सेमिकंडक्टर मार्केट २ लाख कोटी रुपयांचं असल्याचं म्हटलं जातं. 2030 पर्यंत ते ५ लाख कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकतं. सोन्याच्या पाठोपाठ भारताला सेमिकंडक्टर चिप्स निर्यातीसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात. भारतानंही अस्थिर धोरणांनंतर आता कुठं सेमिकंडक्टर मिशनला गांभीयार्नं घेतलंय. डिसेंबर २०२१ मध्ये सेमिकंडक्टर मिशनची घोषणा करून मॅन्युफॅक्चरींग फॅब, टेस्टिंग- पॅकेजिंग युनिट्स उभारणं, चिप डिझाईन करणाऱ्या भारतीय स्टार्टअप्सना प्रोत्साहन, ग्लोबल कंपन्यांना भारतात गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देणं अशी काही लक्ष्यं निर्धारित केलीय. या संपूर्ण मिशनसाठी ७६ हजार कोटींचं पॅकेजही दिलंय. त्यात डिझायनिंगसाठी १ हजार कोटींच्या इंसेन्टिव्हचा समावेश आहे.

तैवानप्रमाणंच भारतानंही सुरुवातीच्या टप्प्यात चिपची असेंब्लिंग, टेस्टिंग आणि पॅकेजिंगकडं लक्ष केंद्रित केलंय, ही समाधानाची बाब आहे. मे २०२५ मध्ये बंगळुरू आणि नोएडात ३ एनएम चिपच्या डिझाईन सेंटरचं उद्घाटन झालं. मागच्या काही वर्षांत भारतीय कंपन्यांनी परदेशी कंपन्यांसोबत टायअप करत गुजरात, आंध्र, ओदिशा, आसाम, पंजाब आदी ठिकाणी १० हून फॅब उभारणीच्या प्रोजेक्टमध्ये कोट्यवधींची गुंतवणूक केलीय. चिप उत्पादनासाठी एक फाउंड्रीज उभारायची झाल्यास त्यासाठी १ ते २ लाख कोटींचा खर्च येतो. त्यामुळं हे काम वाटतं तेवढं सोपं नाहीय. एकटी टीएसएमसी आर अँड डी वर वर्षाला ३.५ लाखांहून अधिक खर्च करते. चीनने सेमिकंडक्टर उद्योगांसाठी ९ लाख कोटींचं बजेट बनवलंय. त्यातुलनेत भारत सुरुवातीच्या पण आश्वासक टप्प्यात वाटचाल करतोय.

ग्लोबल चिप डिझायनिंगमध्ये २० टक्क्यांहून अधिक वाटा भारतीय इंजिनिअर्सचा आहे. कारण बहुतांश कंपन्या अमेरिकेत रजिस्टर्ड असल्या तरी त्या भारतीय ऑफिसेसमधून बरंचसं डिझायनिंगचं काम करतात. भारताबाहेर कंपन्यांमध्येही मोठ्या संख्येनं भारतीय डिझायनर्स काम करतात. याचाच अर्थ चिप डिझायनिंगमध्ये आपल्याकडं प्रचंड ब्रेन पॉवर आहे. गरज आहे ती चिप मॅन्युफॅक्च्युअरिंगमध्ये प्राविण्य मिळवून पुढच्या ५ ते १० वर्षांत कसर भरून काढायची. २०३० पर्यंत ९ लाख कोटींची सेमिकंडक्टर चिप उत्पादन आणि ग्लोबल मार्केटमध्ये १० टक्के वाटा तयार करण्याचं भारताचं लक्ष्य आहे. हे लक्ष्य साध्य केल्यास भारताच्या हातातला हा डिजिटल हिरा मोठ्या दिमाखात चमकताना दिसेल.

## भगव्या वस्त्रांखाली कुकर्माचे साम्राज्य!



धर्म-आस्था आणि श्रद्धेच्या नावाखाली भोळ्याभाबड्या, रंजल्यागांजल्या, दीनदुबळ्या जनतेची जेवढी थट्टा भारतात भोंदूबाबांनी केलीय तेवढी जगातल्या इतर देशांत कदाचितच कुणी केली असेल. धर्म-कर्मकांडाच्या नावाखाली भाविकांचे आयुष्य आणि त्यांच्या भावनांशी खेळणारे हे भोंदूबाबा भाविकांच्या डोळ्यांत धूळफेक करतानाच स्वतः अधर्म व पापाच्या खोल दरीत शिरत जातात. पांढरी किंवा भगवी वस्त्रे परिधान करून कुकर्मांचे साम्राज्य उभारणाऱ्या या भोंदूबाबांच्या कृती उघड होताच त्यांच्या भक्तांसह संपूर्ण समाजालाच त्यांची लाज वाटते. आसाराम बापू, राम रहिम, नित्यानंद, नारायण साई यांच्याच मालिकेत एक नवीन नाव जोडले गेले आहे ते स्वयंघोषित स्वामी चैतन्यानंद सरस्वती याचे.

आपल्याच शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थिनींचे लैंगिक शोषण आणि कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या या अश्लील बाबाविरुद्धच्या गुन्ह्यांची मोजदाद सध्या सुरू आहे. शिक्षणाच्या नावाखाली निष्पाप विद्यार्थिनींचे जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या या बाबांची दिल्ली पोलीस सध्या चौकशी करत आहेत. तब्बल १७ विद्यार्थिनींसह महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे गंभीर आरोप असलेल्या या स्वयंघोषित बाबाला दिल्ली पोलिसांनी रविवारी अटक केली होती. काही दिवसांपूर्वी चमचमत्या बीएमडब्ल्यू कारमध्ये बसून भगव्या वस्त्रांनी भक्तांना चकित करणारा बाबा चैतन्यानंद आता टी-शर्ट आणि चप्पल घालून पोलिसांसमोर खुर्चीत बसला आहे. मोबाईल, आयपॅडचे पासवर्ड विसरल्याचे बहाणे देत आहे. परंतु त्याच्या ३०० पानांच्या कबुलीजबाबावरून त्याचे डर्टी सिक्रेट बाहेर पडत आहेत.

सध्या पोलिसांच्या कोठडीत असलेल्या चैतन्यानंदची कसून चौकशी सुरू आहे. या चौकशीतून चैतन्यानंदचे अनेक लाजिरवाणे आणि धक्कादायक काळे कारनामे समोर येत आहेत. या चौकशीच्या आधारे पोलिसांनी त्याचा मोबाईल, आयपॅड आणि घराचीही तपासणी केली. या तपासणीत त्याच्या मोबाईल, आयपॅडमध्ये अश्लील मेसेज, महिला, विद्यार्थिनींचे गुप्तपणे काढलेले फोटो आढळले. एवढेच नाही तर एका कथित चॅटमध्ये तो दुबईच्या राजासाठी सेक्स पार्टनरची व्यवस्था करण्यास सांगत असल्याचेही समोर आले आहे.

चैतन्यानंदच्या घरातून सेक्स टॉय, अश्लील-पॉर्न दृश्ये असलेली सीडी, ३ बनावट फोटो पोलिसांच्या हाती लागले. या बनावट फोटोमध्ये स्वामी चैतन्यानंद सरस्वती चक्क पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा आणि हॉलिवूडचा सिनेदिग्दर्शक डेव्हिड कॅमेरुन यांच्याबरोबर दिसतो. अर्थात हे फोटो बनावट आहेत. पार्थसारथी नावाचा हा भोंदू बाबा मूळचा ओडिशाचा आहे. दिल्लीच्या वसंत कुंजमध्ये त्यानं शारदा इन्स्टिट्यूट सुरू केली. जिथं त्याचा एकछत्री अंमल होता. आपली लैंगिक इच्छा पूर्ण करण्यासाठी स्वामी चैतन्यानंद या इन्स्टिट्यूटमधल्या गरीब विद्यार्थिनींनाच लक्ष्य करायचा. नोकरीचे खोटे आमिष दाखवून तो त्यांना जाळ्यात ओढायचा. त्यांच्याकडे वेगवेगळ्या इच्छा व्यक्त करायचा. त्याने अनेक विद्यार्थिनींना परदेशात घेऊन जाण्याचे, सर्व सुखसोयी आणि चांगले मार्क्स देण्याचे आश्वासन दिले होते.

चैतन्यानंदने विद्यार्थिनींच्या वसतिगृहाच्या खोल्यांमध्ये छुपे कॅमेरे बसवले होते. तो त्या कॅमेयांद्वारे मुलींचे खासगी क्षण रेकॉर्ड करायचा आणि नंतर ते फोटो दाखवून त्यांना ब्लॅकमेल करायचा. तो विद्यार्थिनींना अश्लील मेसेज पाठवायचा आणि रात्री त्यांना त्याच्या खोलीत बोलवायचा. नकार देणाऱ्या विद्यार्थिनींना करिअर उद्ध्वस्त करण्याची धमकी द्यायचा. हे प्रकरण एका हवाई दलाच्या अधिकाऱ्यापर्यंत पोहोचल्यावर त्यांनी तात्काळ दिल्ली पोलिसांत तक्रार नोंदवली. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता चैतन्यानंदला अटक केली. त्याच्या कुकर्मात भागीदार इन्स्टिट्यूटच्या दोन वॉर्डन आणि एक असोसिएट डीन यांनाही दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांच्या ताब्यात असलेल्या या बाबाला कायद्यानुसार शिक्षा होईल अशी अपेक्षा आहे. पण प्रश्न इथेच संपत नाही. आसाराम बापू, राम रहिमपासून अनेक भोंदूबाबांची उदाहरणे समोर असूनही भारतीय जनता अशा बाबांच्या फसव्या जाळ्यात अडकतेच कशी? लोकांना धार्मिक, सामाजिक उपदेश करत हा बाबा मोठा झाला, फोफावला तो लोकांनी त्याच्या कार्यक्रमांना गर्दी केल्यामुळेच. त्याने ज्या काही शैक्षणिक किंवा सामाजिक संस्था उभारल्या त्या भक्तांच्या देणगीवरच. भक्तांनी त्याला लाखोंच्या देणग्या दिल्याच नसत्या तर हा बाबा बीएमडब्ल्यूसारख्या महागड्या कारमधून कसा काय फिरला असता. पण आजकाल सर्वसामान्य जनताच इतकी आत्मकेंद्री झालीय की तिला या गहिऱ्या खाईतून बाहेर येण्यासाठी बाबाबुवांच्या आधाराची गरज पडते.

धनदांडगे सामाजिक दातृत्वाची खोटी शाल अंगावर पांघरण्यासाठी अशा बाबाबुवांना सढळ हस्ताने मदत करतात, त्यांच्या कार्यक्रमांना गर्दी जमत असल्याने राजकारणीही या बाबांचे पाय धरायला कमी करत नाहीत. कधीकाळी कवडीचीही किंमत नसलेले हे भोंदूबाबा अशाच प्रकारे इव्हेंट मॅनेज करून स्वतःची प्रतिमा चमकवतात आणि भाविकांना आपल्या जाळ्यात अडकवतात. कधीकाळी चमत्काराच्या नावाखाली लोकांच्या श्रद्धेशी खेळ केला जात असे. आता उपदेश आणि धर्माच्या नावाखाली अधमाचा खेळ खेळणाऱ्या फसव्या बाबांची यादी सतत वाढत आहे. पोलिसांच्या कचाट्यात अडकलेल्या चैतन्यानंदची आता काही खैर नाही. बाबाच्या अन्यायाने पीडित विद्यार्थिनींना लवकरात लवकर न्याय मिळेल अशी अपेक्षा. आयुष्य म्हणजे रोलर कोस्टर राइड. या चढउतारात कधी यश येते तर कधी अपयश, पण वाईटातल्या वाईट परिस्थितीतही अशा बाबांच्या नादी न लागणेच बरे.



# हृदयासाठी ही ५ फळं औषध, रोज १ खा... संपेल हार्ट अटॅकचा धोका

## नसांत साचलेलं चिकट पिवळं कोलेस्ट्रॉल झटक्यात होईल साफ

दिवसभर धावपळ, ताणतणाव आणि चुकीच्या आहारामुळे आजकाल हृदयविकाराच्या समस्या झपाट्याने वाढताना दिसत आहेत. थकवा, ताण, चुकीच्या सवयी आणि रक्तदाब-कोलेस्ट्रॉलची वाढ या सगळ्या गोष्टी हळूहळू हृदयावर परिणाम करतात. हृदय हा आपल्या शरीराचा सर्वात महत्त्वाचा अवयव असल्याने त्याचं आरोग्य टिकवून ठेवणं अत्यावश्यक आहे. आपण औषधं घेऊन किंवा तपासण्या करून हृदयाचं रक्षण करतोच, पण त्यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे आपल्या रोजच्या आहारात काही नैसर्गिक गोष्टींचा समावेश करणं. शास्त्रज्ञांच्या मते, काही फळे अशी आहेत जी हृदयासाठी अमृतासमान ठरतात. त्यामध्ये फायबर, अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वं आणि खनिजं भरपूर प्रमाणात असतात, जी धमन्यांमधील प्लेक कमी करून रक्ताभिसरण सुधारतात आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवतात. त्यामुळे दररोज आहारात या खास फळांचा समावेश केल्यास हृदय मजबूत राहते आणि हृदयविकारांचा धोका टाळता येतो.

- **सफरचंद :** Harvard Health नुसार, सफरचंद हृदयासाठी सर्वोत्तम फळ मानलं जातं. यात पेक्टिन नावाचं घुलनशील फायबर असतं, जे शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतं. त्याचबरोबर सफरचंदातील अँटिऑक्सिडंट्स धमन्यांमधील दाह कमी करतात. दररोज एक सफरचंद खाल्ल्यास हृदय निरोगी राहते आणि हृदयविकाराचा धोका मोठ्या प्रमाणात घटतो.
- **संत्री :** Heart and Stroke Foundation of Canada नुसार, संत्र्यात व्हिटॅमिन ड आणि फ्लॅवोनॉइड्स मुबलक प्रमाणात असतात, जे हृदयासाठी लाभदायी आहेत. हे फळ रक्तदाब कमी करण्यात मदत करतं आणि धमन्यांची लवचिकता टिकवून ठेवतं. रोज संत्रं खाल्ल्यास रक्ताभिसरण सुधारतं, शरीराला उर्जा मिळते आणि हृदयाचे आरोग्य दीर्घकाळ टिकून राहतं.
- **द्राक्षं :** Healthline नुसार,द्राक्षांमध्ये असलेले पॉलीफेनोल्स हृदयासाठी उपयुक्त मानले जातात. ते रक्तदाब नियंत्रित ठेवतात आणि रक्तातील वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करतात. नियमितपणे द्राक्षं खाल्ल्याने हृदयविकारांचा धोका कमी होतो, तसेच मेंदू आणि हाडांसाठीही ते फायदेशीर ठरतात.
- **पपई :** Healthline नुसार, पपईत अँटिऑक्सिडंट्स आणि आवश्यक जीवनसत्त्वं असतात, जी हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त आहेत. हे फळ रक्तातील कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतं आणि पचनक्रिया सुधारतं. पपईचं नियमित सेवन केल्यास शरीर हलकं वाटतं, ताजेतवानेपणा टिकतो आणि हृदय अधिक निरोगी राहातं.
- **डाळिंब :** डाळिंबाला हृदयासाठी अमृत मानलं जातं. त्यातील पॉलीफेनोल्स रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. डाळिंब खाल्ल्याने रक्तवाहिन्या स्वच्छ राहतात आणि रक्ताभिसरण सुधारतं. रोज डाळिंब खाण्याची सवय लावल्यास हृदयविकार, स्ट्रोक आणि अँजाइना यांसारख्या आजारांचा धोका कमी होतो.

---

## तुमची प्लेट जितकी रंगीत, तितकं आरोग्य उत्तम!

# प्रत्येक रंग सांगतो आरोग्याचा मंत्र



आपण नेहमी ऐकतो की हिरव्या भाज्या खाल्ल्या पाहिजेत, कारण त्या आरोग्यासाठी चांगल्या असतात. पण खरं आरोग्य फक्त हिरव्या भाज्यांमध्ये नाही, तर सर्व रंगांच्या भाज्या आणि फळांमध्ये दडलेलं आहे. म्हणजेच तुमच्या प्लेटमध्ये जितके रंग, तितके आरोग्याचे फायदे. तज्ज्ञांच्या मते, एकाच प्रकारचं अन्न किंवा भाजी खाल्ल्याने शरीराला मर्यादित पोषक घटक मिळतात. पण प्लेटमध्ये वेगवेगळ्या रंगांच्या भाज्या व फळे असतील तर शरीराला विविध जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स मिळतात. म्हणूनच पोषणतज्ज्ञ नेहमी रंगीत सॅलड खाण्याचा सल्ला देतात.

- **लाल रंग – हृदय व त्वचेचे रक्षण** : टोमॅटो, बीट, स्ट्रॉबेरी, टरबूज यांसारख्या लाल भाज्या आणि फळांमध्ये लायकोपीन आणि अँथोसायनिन मुबलक प्रमाणात असतात. हे घटक हृदयाचे आरोग्य सुधारतात, त्वचेला चमकदार ठेवतात आणि वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावतात. नियमित लाल भाज्या खाल्ल्याने कर्करोगासारख्या आजारांचा धोका कमी होतो.
- **पिवळा–नारिंगी रंग – डोळे व रोगप्रतिकारशक्तीसाठी उत्तम** : गाजर, संत्रे, पपई, कॉर्न, पिवळी शिमला मिरची यामध्ये बीटा-कॅरोटीन आणि जीवनसत्त्वे अ व क असतात. हे पदार्थ डोळ्यांची दृष्टी सुधारतात, रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात आणि मेंदू तंदुरुस्त ठेवतात. विशेषतः मुलं व ज्येष्ठ नागरिकांसाठी हे पदार्थ हाडे मजबूत करण्यात आणि त्वचा निरोगी ठेवण्यात मदत करतात.
- **हिरवा रंग – डिटॉक्स आणि वजन नियंत्रण** : पालक, ब्रोकोली, काकडी, हिरवे सफरचंद यांसारख्या भाज्या आणि फळांमध्ये लोह, कॅल्शियम, क्लोरोफिल असतात. हे घटक पचनसंस्था सुधारतात, शरीरातील विषारी घटक बाहेर काढतात आणि रक्तातील साखर नियंत्रणात ठेवतात. हिरव्या भाज्या वजन कमी करण्यासाठीही प्रभावी मानल्या जातात.
- **निळा–जांभळा रंग – स्मरणशक्ती आणि मूत्रपिंडांसाठी लाभदायी** : ब्लॅकबेरी, ब्लूबेरी, वांगी, द्राक्षे यांसारख्या निळसर-जांभळ्या पदार्थांमध्ये अँथोसायनिन्स आणि रेझवेराट्रोल आढळतात. हे घटक स्मरणशक्ती सुधारतात, वृद्धत्वाचा परिणाम कमी करतात आणि हृदय निरोगी ठेवतात. विशेष म्हणजे ब्लूबेरी व द्राक्षे मूत्रपिंडांसाठी खूप फायदेशीर आहेत.
- **पांढरा रंग – रोगप्रतिकारशक्ती मजबूत करतो** : कांदे, लसूण, मुळा, मशरूम यांसारख्या पांढऱ्या भाज्यांमध्ये ॲलिसिन आणि फ्लेव्होनॉइड्स असतात. हे घटक कोलेस्टेरॉल कमी करतात, रक्तदाब नियंत्रित ठेवतात आणि शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवतात.
- **रंगीत प्लेट – नैसर्गिक आरोग्यपूरक** : तज्ज्ञ सांगतात की, जर आपण दररोजच्या आहारात ४-५ वेगवेगळ्या रंगांच्या भाज्या व फळांचा समावेश केला, तर शरीराला आवश्यक असलेले सर्व पोषक तत्त्वे मिळतात. अशा वेळी वेगळे पूरक आहार घेण्याची गरजही राहत नाही. म्हणूनच, पुढच्या वेळेस जेव्हा तुम्ही प्लेटमध्ये सॅलड वाढाल, तेव्हा लक्षात ठेवा जितके रंग, तितकं आरोग्य!

---




बऱ्याच प्राणीप्रेमींच्या घरी पाळीव प्राणी असतात. हे लोक आपल्या प्राण्यांना अगदी घरातील सदस्याप्रमाणे ठेवतात. म्हणजेच त्यांचे लाड करणे, त्यांना जवळ घेणे, त्यांना किस करणे. ही सर्व उदाहरणे आपण आपल्या आजूबाजूला पाहतो. पण हे करण्यापूर्वी तुम्ही काळजी घेणे गरजेचे आहे. म्हणजेच एका संशोधनातून असे समोर आले आहे की, जर तुम्ही पाळीव प्राण्यांना किस केले तर अनेक प्रकारचे गंभीर आजार होण्याची शक्यता असते. पाळीव प्राण्यांना जवळ घेतल्यास किंवा किस केल्यास झुनोटिक ट्रान्समिशन या आजाराचा धोका असतो. कारण त्यांच्या लाळेत आणि तोंडात हानिकारक जीवाणू असू शकतात जे मानवांच्या तोंडात गेल्यास रोग निर्माण करणारे ठरतात. प्राण्यांच्या लाळेत साल्मोनेला, पाश्चुरेला आणि बाटोर्नेलासारखे जंतू असू शकतात. हे जंतू मानवाच्या तोंडात गेल्यास संसर्ग, पोटाच्या समस्या यासह गंभीर आजार होण्याची शक्यता असते. कुत्र्याच्या तोंडात आणि लाळेमध्ये कॅपनोसाइटोफागा बॅक्टेरिया असतो. जो त्यांच्या संपर्कात आल्यानंतर किंवा कुत्र्याच्या चावण्याद्वारे लोकांमध्ये प्रसारित होऊ शकतो. यामुळे प्रत्येकालाच धोका असतो असे नाही. मात्र रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असलेल्या लोकांना धोका असू शकतो. यामुळे गंभीर आजार होण्याची शक्यता असते. जर तुम्ही तुमच्या पाळीव कुत्र्याला कच्चे मांस खायला दिले तर चुकूनही त्याला किस करू नका. कच्चे मांस खाल्ल्याने कुत्र्यांच्या तोंडात साल्मोनेलासारखे आजार होण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत कच्चे मांस खाणाऱ्या कुत्र्याला किस तुम्हीलाही हा आजार होण्याचा धोका संभवतो. मांजरीच्या विष्ठा-तोंडाच्या मार्गाने आजार पसरतात. मांजरीच्या विष्ठेचा ट्रे हाताळल्यानंतर आपले हात धुणे किंवा हातमोजे वापरणे महत्वाचे आहे. तसेच मांजरींच्या चाव्याव्दारे आणि ओरखड्यांद्वारे देखील संक्रमण होऊ शकते.

- पाळीव प्राण्यासोबत खेळल्यानंतर, त्यांची विष्ठा साफ केल्यानंतर हात धुवा.
- पाळीव प्राण्यांना तुमचा चेहरा किंवा उघड्या जखमा चाटू देऊ नका.
- पाळीव प्राण्यांना स्वयंपाकघरात येऊ देऊ नका.
- पाळीव प्राणी आजारी असल्यास पशुवैद्याकडे घेऊन जा.

---




**आपल्या दैनंदिन जीवनात तणाव हा नित्यसाथीचा भाग बनला आहे. काम, घरकाम, जबाबदाऱ्या, या सगळ्यामुळे मन सतत व्यस्त राहते. अनेकदा आपण औषधांचा विचार करतो, योगा किंवा ध्यान देखील करतो, पण बऱ्याचदा तणावमुक्त राहणे हे आपल्या घराच्या वातावरणावर अवलंबून असते. घरातच काही छोटे बदल करून तुम्हाला मन:शांती तर मिळेलच शिवाय तणावमुक्त आयुष्य जगण्यासही मदत होईल. चला तर मग जाणून घेऊया...**

१. **वेळोवेळी साफसफाईची आवश्यकता :** सकाळी उठल्यापासून संध्याकाळपर्यंत आपण अनेक कामे करतो, पण घरातील अस्वच्छतेकडे आपोआप दुर्लक्ष होते. घरातील धूळ, कचरा किंवा अस्वच्छता आपल्याला मानसिकदृष्ट्या तणावित करते. स्वच्छ आणि नीटनेटके वातावरण आपल्याला ताजेतवाने ठेवते. एखादे काम करण्याचा हुरूपही कायम राहतो. त्यामुळे घर नेहमी स्वच्छ, नीटनेटके ठेवावे.

२. **स्वत:साठी जागा तयार करा :** योगा, गिटार वाजवणे, ध्यान किंवा चित्रकला यांसारखे छंद आपल्याला मानसिक शांती देतात. अनेकदा छोटे घर असल्यामुळे किंवा खूप सामानामुळे घरात स्वत:साठी जागा मिळणे कठीण असते. त्यामुळे घरात एक कोपरा फक्त स्वत:साठी राखून ठेवा. ही जागा तुमच्या आवडीच्या छंदांसाठी वापरा, त्यामुळे तुम्ही व्यस्त तर राहालच पण मन देखील प्रसन्न राहील आणि तणाव दूर होईल.

३. **घर सजवा आणि नवा लूक द्या :** घरातील लहान-सहान वस्तूंची जागा बदलवून, रंगरंगोटी करून किंवा एखाद्या कोपऱ्याला नवीन लूक देऊन तुम्ही घरात नाविन्यपणा आणू शकता. सोफा, खुर्ची किंवा एखाद्या लहानश्या सजावटीच्या वस्तूची जागा बदलल्याने वातावरण बदलते आणि मनाला ताजगी मिळते.

४. **अरोमाथेरपी वापरा :** सुगंधी मेणबत्त्या, अगरबत्ती किंवा सुवासिक लाकूड वापरणे तणाव कमी करण्यासाठी प्रभावी आहे. अरोमाथेरपीच्या सुगंधांमुळे घरातील वातावरण शांत आणि सुंदर बनते. बाजारात अनेक सुगंधी उत्पादनं उपलब्ध आहेत, ज्यांचा वापर करून घरात आल्हाददायी वातावरण तयार करता येते.

५. **फेंगशुईच्या वस्तू घरी ठेवा :** फेंगशुई हा एक प्राचीन उपाय आहे ज्यामुळे घरातील नकारात्मक ऊर्जा कमी होते आणि सकारात्मक ऊर्जा वाढते. घोड्याचा पुतळा, लाफिंग बुद्धा किंवा विंड चाइम्स लावल्याने घरात आनंद आणि समाधानाची भावना निर्माण होते. सजावटीसाठी सुद्धा हे अतिशय आकर्षक असतात.

६. **संगीत थेरपी :** आवडती गाणी ऐकणे किंवा वाद्य वाजवणे हे मनाला आनंद देणारे छंद आहेत. आवडतं गाणं गुणगुणल्याने मानसिक तणाव कमी होतो आणि मूड सुधारतो.

७. **घरातील झाडं :** घरातील झाडे मानसिक आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. एरिका पाम, पाइन प्लांट, एलोवेरा, स्पायडर प्लांट यासारखी झाडे घरात ठेवली तर घरातील हवा शुद्ध राहते आणि मनाला शांती मिळते. ही झाडे घराला निसगार्ची ताजगी देतात आणि वातावरण सुखद करतात.

---

## घरगुती फेसपॅकने काही मिनिटांतच मिळवा नैसर्गिक ग्लो

कामाच्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये अनेक महिला आपल्या त्वचेची योग्य काळजी घेण्यात मागे पडतात. अपुरी झोप, मानसिक तणाव, जंक फूड, तिखट आणि तेलकट पदार्थांचे जास्त सेवन या सगळ्यामुळे शरीरासह त्वचासुद्धा परिणामित होते. विशेषतः डोळ्यांखाली आलेले काळे डाग किंवा डोळ्यांखालील काळी वतुर्ळे त्वचेचे सौंदर्य कमी करतात आणि चेहरा निस्तेज, थकलेला दिसतो. हार्मोनल बदलांमुळे चेर्हयावर पिगमेंटेशन आणि डार्क स्पॉट्स वाढत जातात. बाजारातील क्रीम, लोशन किंवा सीरम काही दिवसांपुरते चमक आणतात, पण नैसर्गिक ग्लो टिकवण्यासाठी घरगुती उपाय अधिक प्रभावी ठरतात. त्यातच बटाटा हा एक उत्कृष्ट नैसर्गिक पर्याय आहे. बटाट्यामध्ये असलेला नैसर्गिक थंडावा डोळ्यांभोवती उष्णता कमी करण्यास मदत करतो आणि त्वचेला नैसर्गिक चमक देतो. बटाटा नॅचरल ब्लिचिंग एजंट म्हणून ओळखला जातो, ज्यामुळे त्वचेवरील डार्क स्पॉट्स आणि पिगमेंटेशन कमी होतो.

**बटाट्याचा फेसपॅक करण्याची सोपी पद्धत:**

- एका वाटीत तांदळाचे पीठ घ्या.
- त्यात चिमूटभर हळद आणि थोडा बटाट्याचा रस मिसळून गुळगुळीत पेस्ट तयार करा.
- तयार पेस्ट संपूर्ण चेहऱ्यावर आणि मानेवर लावा.
- काही मिनिटे तसेच राहू द्या.
- नंतर हातांवर पाणी लावून हलक्या हाताने मसाज करा.

या फेसपॅकमुळे डेड स्किन दूर होते, त्वचा उजळते, डार्क स्पॉट्स कमी होतात आणि चेहरा नैसर्गिकरित्या तेजस्वी दिसतो. बटाटा आणि तांदळाचा नैसर्गिक फेसपॅक नियमित वापरल्यास त्वचेची गुणवत्ता सुधारते आणि त्वचा अधिक निरोगी व चमकदार होते.

---




सोनं-चांदी महाग झाल्याने अनेक महिला सण-समारंभासाठी आर्टिफिशियल दागिन्यांनाच पसंती देतात. पण हे दागिने काही दिवस वापरले नाहीत की ते काळसर होतात. अशा वेळी नवे दागिने घ्यायची गरज नाही, कारण घरच्या घरी काही सोप्या ट्रिक्स वापरून तुम्ही त्यांना पुन्हा नवी झळाळी देऊ शकता.

**काही सोप्या ट्रिक्स पुढीलप्रमाणे :**

- **बेकिंग सोडा आणि पाणी** : बेकिंग सोडा जवळपास प्रत्येक घरात असतो. अर्धा कप पाण्यात एक चमचा सोडा मिसळून घट्ट पेस्ट बनवा. ही पेस्ट दागिन्यांवर लावून मऊ ब्रशने हलक्या हाताने स्वच्छ करा. नंतर स्वच्छ पाण्याने धुऊन कोरडे करा. यामुळे काळपटपणा लगेच निघून जातो.
- **टूथपेस्ट :** दात घासण्यासाठी वापरण्यात येणारी टूथपेस्ट दागिन्यांसाठीसुद्धा उत्तम ठरते. थोडी पेस्ट दागिन्यांवर लावून ब्रशने हलक्या हाताने घासा. मग पाण्याने धुऊन कोरडे करा. दागिने पुन्हा एकदम नवीन दिसतील.
- **व्हिनेगर आणि मीठ :** एका भांड्यात कोमट पाणी, एक चमचा पांढरा व्हिनेगर आणि चिमूटभर मीठ घाला. दागिने यात १५ मिनिटे भिजवा. या उपायाने दागिन्यांवरची घाण सहज निघते. त्यानंतर ते धुऊन कापडाने पुसून वाळवा.
- **लिंबाचा रस** : लिंबाच्या रसात दागिने ५-१० मिनिटे ठेवले तर त्यावरील गंज व काळसरपणा सहज निघतो. त्यानंतर मऊ कापडाने घासून स्वच्छ पाण्याने धुवा. दागिने पुन्हा झगमगू लागतात.

**दागिन्यांची चमक जास्त काळ टिकवण्यासाठी टिप्स :**

दागिने वापरल्यानंतर नेहमी मऊ कापडाने स्वच्छ करून ठेवा.

- हार, झुमके, अंगठ्या वेगवेगळ्या पाउच किंवा बॉक्समध्ये ठेवा, त्यामुळे ऑक्सिडायझेशन टळेल.
- कोणतेही स्ट्रॉंग क्लीनर वापरणे टाळा.
- दागिने घासण्यासाठी कधीही कडक ब्रश वापरू नका, त्यामुळे दागिन्यांवर ओरखडे येऊ शकतात. मऊ कापड किंवा जुना टूथब्रश वापरा.
- या सोप्या घरगुती उपायांमुळे तुमचे आवडते आर्टिफिशियल दागिने पुन्हा नव्यासारखे चमकतील आणि प्रत्येक सण-समारंभात तुमचा लूक उठून दिसेल.

---



## बाळाच्या आहारात कडधान्यांचा समावेश

# पौष्टिकतेच्या दिशेने पहिले पाऊल

पालकांसाठी बाळाच्या आहाराची योग्य निवड करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विविध पोषणतत्त्वांनी भरपूर असलेल्या कडधान्यांचा समावेश बाळाच्या आहारात केल्यास त्याच्या शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना मिळते. पण, कडधान्ये कोणत्या वयात आणि कशा प्रकारे द्यावीत? हे जाणून घेणं आवश्यक आहे.

**कडधान्यांचा आहारात समावेश कधी करावा?**

आहारात कडधान्ये समाविष्ट करण्याची योग्य वेळ म्हणजे बाळ ६ ते ८ महिन्यांचे झाल्यावर. शिजवलेली, मऊसर कडधान्ये बाळासाठी सुरक्षित असतात. सुरुवातीला कडधान्ये कमी प्रमाणात द्यावे आणि हळूहळू वाढवावे.

**कडधान्य पोषणतत्त्वांचा खजिना**

- **प्रथिने** : वाढी आणि स्नायूंच्या मजबुतीसाठी
- **लोह** : रक्तक्षय आणि अशक्तपणापासून संरक्षण
- **फायबर :** पचनाच्या समस्यांपासून मुक्तता
- **फोलेट व बी जीवनसत्त्वे** : मेंदूच्या विकासासाठी

**सर्वोत्तम कडधान्ये आणि त्यांचे फायदे**

- **राजमा :** प्रथिने आणि लोहासाठी उत्तम.
- **काळी उसळी** : अँटीऑक्सिडंट्सचा खजिना.
- **मसूर :** पचण्यास सोयीस्कर

**कडधान्ये देताना काळजी घेण्याच्या गोष्टी**

- **संपूर्ण सुकी कडधान्ये :** पचायला कठीण असतात.
- **मीठ/साखर घातलेली डबाबंद कडधान्ये** : बाळांसाठी हानिकारक.
- **सोयाबीन** : एक वर्षाच्या खालील बाळांसाठी हानिकारक

**कडधान्ये शिजवण्याची योग्य पद्धत**

- रात्रभर भिजवलेली कडधान्ये शिजवावीत.
- ६-८ महिन्यांच्या बाळासाठी प्युरी किंवा मॅश करा.
- ९-१२ महिन्यांसाठी बोटांनी खाता येईल अशा मऊ तुकड्यांमध्ये द्या.

**पालकांसाठी टिप्स आणि सामान्य प्रश्न**

- बेक्ड कडधान्ये टाळा. घरच्या शिजवलेल्या कडधान्यांवर लक्ष केंद्रित करा.
- कडधान्ये बाळाला आठवड्यातून २-३ वेळा द्यावीत.
- सुरुवात मसूर किंवा मूगडाळीपासून करा आणि हळूहळू इतर कडधान्यांचा समावेश करा.

कडधान्ये हे पोषणदृष्ट्या समृद्ध आणि बाळाच्या आहारात महत्त्वपूर्ण स्थान असलेले अन्न आहे. योग्य पद्धतीने दिल्यास, ते बाळाच्या आरोग्यासाठी सुरक्षित आणि फायदेशीर ठरू शकतात.

# आयात-निर्यात व्यवहारांसाठी आता डिजिटल बॉन्ड

## कागदी स्टॅम्प पेपरला ‘गुडबाय’... महसूल मंत्री बावनकुळेंचा महत्त्वाकांक्षी निर्णय

**■बातमी/लेख, प्रीती दिपक नाईक**

महाराष्ट्रातील व्यापार व उद्योग जगताला मोठा दिलासा देत राज्य सरकारने आयात-निर्यात व्यवसायातील पारंपरिक कागदी बॉन्ड बंद करून त्याऐवजी ‘ई-बॉन्ड’ प्रणाली सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचा दुवा ठरणारे हे पाऊल असून, व्यवहार सुलभ करणाऱ्या प्रक्रियेला गती देईल, असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ई-बॉन्ड सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील सोळावे राज्य असून, आयात निर्यात व्यवहारासाठी वापरण्यात येत असलेले कागदी स्वरूपातील स्टॅम्प पेपर आजपासून बंद झाल्याचेही ते म्हणाले.





सध्या आयात-निर्यात व्यवसायांसाठी दर महिन्याला सुमारे तीन ते चार हजार बॉन्ड काढले जातात, ज्यामुळे वषार्काठी चाळीस हजारांहून अधिक बॉन्ड स्वीकारले जातात. या सर्व मोठ्या व्यवहारात आता ई- बॉन्डमुळे क्रांती होणार आहे. ही प्रक्रिया प्रथमदर्शनी लहान वाटत असली तरी, महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसाठी हा एक महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरेल, असेही ते म्हणाले.

ई-बॉन्ड पद्धती कशी असेल आणि तिचा राज्याच्या अर्थकारणाला कसा लाभ होईल, याचे सादरीकरण नोंदणी व मुद्रांक महानिरीक्षक रवींद्र बिनवडे यांनी मंत्रालयात झालेल्या उद्घाटन कार्यक्रमात केले. यावेळी अर्थ राज्यमंत्री आशीष जैस्वाल, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, न्हावाशेवा बंदराचे आयुक्त विजय ऋषी आदी उपस्थित होते.

**असे होणार ई-बॉन्डचे फायदे!**

आयात-निर्यात करणाऱ्या व्यावसायिकांना आता महाराष्ट्रातील सर्व कस्टम कार्यालयांमधून ई-बॉन्ड सहजपणे उपलब्ध होतील. बॉन्ड मिळवण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी आणि वेगवान होणार आहे.

**कागद आणि पर्यावरणाचे रक्षण!**

आजपर्यंत वापरले जाणारे पाचशे रुपयांचे कागदी स्टॅम्प पेपर आता बंद होतील. त्यांच्या जागी डिजिटल बॉन्ड उपयोगात येणार असल्याने मोठ्या प्रमाणात कागदांची बचत होईल, ज्यामुळे पर्यावरणाचेही रक्षण होईल.

**आर्थिक व्यवहारात पारदर्शकता!**

ई-बॉन्डमुळे व्यवहारात सुलभता येण्यासोबतच पारदर्शकता वाढेल, तसेच महसुलाची गळती थांबण्यास मदत होऊन सरकारी तिजोरीत भर पडेल. राज्य सरकारने डिजिटल माध्यमांचा वापर करून प्रशासनात आधुनिकता आणण्याचा घेतलेला हा निर्णय, महाराष्ट्राला व्यापार सुलभतेच्या निर्देशांकात अधिक वरच्या स्थानी घेऊन जाण्यास निश्चितच मदत करेल.

# नाशिकमध्ये रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे चौघांचा बळी

## मेरी-म्हसरूळ भागातील नागरिकांचा प्रशासनाविरोधात तीव्र संताप

**■नाशिक। प्रतिनिधी:**

गेल्या काही महिन्यांपासून शहरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था आणि त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाच्या विरोधात असलेला मोठा असंतोष शुक्रवारी उफाळून आला. मेरी-म्हसरूळ भागातील शेकडो नागरिक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी प्रशासनाच्या धोरणाचा जाहीर निषेध केला.

आरटीओ कॉर्नर ते रासबिहारी शाळा या महत्त्वाच्या लिंकरोडवर खड्ड्यांमुळे झालेल्या विविध अपघातांमध्ये गेल्या दोन महिन्यांत तब्बल चार बळी गेल्याचा नागरिकांचा आरोप आहे. या जीवघेण्या परिस्थितीमुळे

संतप्त झालेल्या नागरिकांनी प्रशासनाचा निषेध केला आणि तत्काळ उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

रिंगरोडचे स्वरूप असलेल्या या रस्त्याची रुंदी ९ मीटर देखील



नाही. १८ फूट रुंदीच्या या रस्त्याच्या साईडपट्ट्या खोलवर असल्याने त्या वाहतुकीसाठी अजिबात वापरता येत नाहीत, ज्यामुळे रस्त्याच्या अरुंदपणात भर पडली आहे.

या रस्त्यावरून दररोज हजारो वाहने ये-जा करतात. या समस्येची प्रशासनाला वेळोवेळी जाणीव करून देण्यात आली, मात्र तरीही प्रशासनाचे डोळे उघडले नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

हा लिंकरोड अतिशय मोठ्या वर्दळीचा आहे. या भागात अनेक महाविद्यालये आणि व्यापारी प्रतिष्ठाने असल्यामुळे लोकांची आणि वाहनांची मोठी वर्दळ असते. याशिवाय, गुजरातला जाणारी तसेच मुंबई-आग्रा महामार्गावरील काही वाहतूक याच रस्त्यावरून होते. नाशिकमधून जाणाऱ्या उड्डाणपुलावर चढण्यासाठी हा रस्ता सोयीस्कर असल्याने दररोज हजारो वाहने या मार्गावरून धावतात.

“नाशिकमध्ये वाहनसंख्या प्रचंड वाढली असताना पायाभूत सुविधा विकसित करण्याकडे मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. गेल्या काही महिन्यांपासून रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांनी शहरवासीय हैराण झाले आहेत. आरटीओ कॉर्नर ते रासबिहारी शाळा लिंकरोड अरुंद असला तरी येथून दररोज ये-जा करणाऱ्या वाहनांची सरासरी संख्या तीस हजारांच्या घरात आहे. यासंदर्भात महापालिका प्रशासनाला वेळोवेळी निवेदने देऊनही कार्यवाही झाली नाही. आज सगळ्यांच्या भावनांचा उद्रेक झाला आणि आम्ही रस्त्यावर आलो. प्रशासनाने तत्काळ उपाययोजना केल्या नाहीत, तर तीव्र आंदोलन करण्यात येईल.”

**-प्रसाद सानप, उपाध्यक्ष, मनसे नाशिक**

# शहरात कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी पालिका शुल्क आकारणार

**■ठाणे। प्रतिनिधी:**

ठाणे शहरातील कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असताना महापालिकेने मोठ्या गृहसंकुलांना कचऱ्याची विल्हेवाटीसाठी शुल्क आकारणीसाठी तयारी सुरू केली आहे. १०० किलोग्रॅमपेक्षा अधिक कचऱ्याची निर्मिती करणाऱ्या गृहसंकुलांचा महापालिकेने सर्व्हे सुरू केले असून सध्या ६७१ गृहसंकुल आणि ७० वाणिज्य आस्थापनांचा तपास केला जात आहे.

महापालिकेच्या घनकचरा विभागाने आधीच ओला आणि सुका कचरा विल्हेवाटीसाठी सूचना दिल्या आहेत. ज्या आस्थापनांनी या सूचनांचे पालन केले नाही, त्यांचे कचऱ्याचे व्यवस्थापन महापालिकेने स्वतःच्या हाती घेऊन त्याचे शुल्क वसूल केले जाईल, असे इशाराही दिले गेले आहे. केंद्र सरकारच्या सहा वर्षांपूर्वीच्या आध्यादेशानुसार, १०० किलोग्रॅमपेक्षा जास्त कचऱ्याचे निर्माण करणाऱ्या आणि ५ हजार स्केअर मीटरपेक्षा जास्त क्षेत्रफळ



असलेल्या सोसायटीने कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याच ठिकाणी विल्हेवाट करणे अनिवार्य आहे. महापालिका म्हणते की, कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट सुनिश्चित करण्यासाठी आता हक्काचे डम्पिंग सेंटर सुरू केले जात आहेत, जे भविष्यातील कचऱ्याच्या समस्या टाळण्यास मदत करतील.

**राजकीय अडथळयांमुळे योजना रखडल्या**

महापालिकेने तीन वर्षांपूर्वी ४२५ गृहसंकुलांना नोटीस बजावल्या होत्या; मात्र राजकीय अडथळ्यांमुळे योजना पूर्णतः राबवता आलेली नाही. आता नव्या सर्व्हेत ७४१ गृहसंकुल व आस्थापनांचा समावेश आढळला असून त्यांची विल्हेवाट प्रक्रिया तपासली जाणार आहे.

**कचऱ्यातील गुलाबजाम खाल्ल्याने मुलीला विषबाधा**

कल्याण पूर्वेतील सूचक नाका परिसरात धक्कादायक घटना समोर आली आहे. खेळता खेळता डम्पिंगच्या कचऱ्यातील गुलाबजाम खाल्ल्याने मुलीची प्रकृती बिघडली आहे. या मुलीचे नाव अनिता चंद्रवंशी असून तिच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने सूचक नाका टेकडीवर कचरा टाकला जात असून या डम्पिंग ग्राउंडला नागरिकांचा विरोध आहे. या डम्पिंग ग्राउंडमुळे नागरिक कर्चयाच्या दुर्गंधीने त्रस्त असून, भरवस्तीत डम्पिंग नकोच अशी भूमिका नागरिकांनी घेतली आहे. कचरा टाकणे थांबवले नाही तर उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते भारत सोनावणे यांनी दिला आहे.

# कणवासियांना खुशखबर, पश्चिम महाराष्ट्रात आता जलद पोहोचा, अंबा घाटामध्ये खास सोय होणार

**■रत्नागिरी। प्रतिनिधी:**

कोकण ते पश्चिम महाराष्ट्र होणारा अंबा घाटातील प्रवास आता अधिक सोयीस्कर आणि जलद होणार आहे. कारण या घाटातील डोंगरातून साडेतीन किलोमीटरचा बोगदा काढण्यास मंजुरी मिळाली आहे. रत्नागिरी-कोल्हापूर या राष्ट्रीय महामार्गावरील धोकादायक वळणं आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रवास अत्यंत सुरक्षित आणि जलद होणार आहे. यासाठी सध्या एका खासगी एजन्सीकडून या प्रकल्पाचे सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे.

एकीकडे, कोल्हापूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण युद्धपातळीवर सुरु असतानाच, अंबा घाटाच्या सुधारणा आणि रुंदीकरणाच्या दृष्टीने हे सर्वेक्षण महत्त्वाचे ठरणार आहे. हा घाट हा साधारण सात किलोमीटर लांबीचा आहे. पावसाळ्यात अनेक वेळा दरड कोसळण्याचे प्रकारही या घाटात घडतात.

या पार्श्वभूमीवर, घाटातील धोकादायक भाग कायमस्वरुपी वगळण्यासाठी हा मोठा निर्णय



घेण्यात आल्याची माहिती आहे. सर्वेक्षणानंतर बोगद्याची लांबी, रुंदी आणि तांत्रिकदृष्ट्या आराखडा तयार करण्यात येईल. या आराखड्यानंतर अंदाजपत्रक तयार करून त्याला मंजुरी मिळाल्यावर तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केल्या जातील. त्यानंतरच प्रत्यक्ष काम सुरु होणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

पर्यावरणाचा समतोल राखून घाटातील वन्य प्राणी, राष्ट्रीय उद्यान आणि जंगल परिसराचा विचार करून हा प्रकल्प अहवाल येणार निश्चित करण्यात येणार असून त्यानुसारच याला अंतिम स्वरुप देण्यात येणार आहे.

**कल्याण-शिळ रस्त्यावरील कोंडीचे ग्रहण कायम**

दुसरीकडे कल्याण-शिळ मार्गावर सुरू असलेली मेट्रोची कामं, रस्त्यावर पडलेले खड्डे यामुळे मार्गावरील वाहतूक कोंडीचं ग्रहण कायम आहे. वाहन चालक या कोंडीत तास न् तास अडकत असल्याने इंधन आणि वेळेचा अपव्यय होत आहेच. शिवाय त्यांना प्रचंड मानसिक त्रासालाही सामोरं जावं लागत आहे. परिणामी, वाहन चालकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

कल्याण-शिळ या महत्त्वाच्या मार्गावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून रस्ता रुंदीकरणासह काँक्रीटीकरणावर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले. परंतु ही कोंडी फुटण्याची चिन्हं अद्याप दिसत नाहीत. या रस्त्यावर अनेक ठिकाणी सिमेंट उखडल्याचं सांगितलं जात आहे. या मार्गावर मेट्रोचे काम सुरू असल्याने पिलर उभारण्यासाठी निम्म्याहून अधिक रस्ता बॅरिकेडने बंद करावा लागत आहे. परिणामी अरुंद रस्त्यातून बाहेर पडताना वाहन चालकाची मोठी दमछाक होत आहे.

# अनधिकृत फेरीवाल्यांवर सतत कारवाई करण्याचे आदेश

**■भाईंदर। प्रतिनिधी:**

मिरा-भाईंदर शहरात रस्त्यांवर फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या फेरीवाल्यांमुळे रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी अतिक्रमण विभागाची शुक्रवारी आढावा बैठक घेतली. या बैठकीत शहरातील रस्ते, चौक, फुटपाथ व सार्वजनिक ठिकाणांवर अनधिकृतरीत्या बसलेल्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्याबाबत महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

नागरिकांना होणारी गैरसोय, वाहतूक कोंडी तसेच सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेवर होत असलेला परिणाम लक्षात घेता, आयुक्तांनी अतिक्रमण विभागाला तात्काळ आणि सातत्यपूर्ण कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. मिरा-भाईंदर शहरात फेरीवाले रस्ता अडवून, फुटपाथवर बसलेले असतात. या फेरीवाल्यांमुळे पादर्चायांना आणि वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. पालिका या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करते. परंतु कारवाई संपली की फेरीवाले



पुन्हा रस्त्यांवर आपले बस्तान मांडतात. यामुळे आयुक्तांनी अतिक्रमण विभागाची बैठक घेतली.

यावेळी चौकांवर, फुटपाथवर आणि रस्त्यावर बेकायदेशीरपणे बसर्णाया फेरीवाल्यांवर दररोज कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच ही कारवाई एकदाच करून थांबवण्याऐवजी सतत सुरू राहावी. तसेच, वाहतूक पोलीस विभागाच्या प्रतिनिधींशी समन्वय साधून रस्त्यांवरील कोंडी कमी करण्यासाठी विशेष लक्ष देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. या बैठकीस अतिक्रमण विभागाच्या उपायुक्त कल्पिता पिंपळे, सर्व प्रभाग सहाय्यक आयुक्त तसेच वाहतूक पोलीस विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# सततच्या पावसामुळे मासेमारी व्यवसाय ठप्प, मदतीची मागणी

**■भाईंदर। प्रतिनिधी:**

अरबी समुद्रात व बंगालच्या सागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने मागील काही दिवसांपासून सातत्याने पडत असलेल्या पावसामुळे मच्छीमारी ठप्प झाली आहे. त्यामुळे मासेमारी करर्णायांसमोर खर्च भागवण्याची समस्या निर्माण झाली आहे. निसर्गाच्या लहरीपणाचा फटका बसलेल्या शेतकर्यांना सरकारकडून मदत दिली जाते. त्यामुळे शासनाने शेतकर्यांप्रमाणेच मच्छीमारांना मदत करण्याची मागणी मच्छीमारांनी शासनाकडे केली आहे. याबाबत बोलताना, मिरा-भाईंदरमधील उत्तन परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिक मासेमारी व्यवसायावर अवलंबून आहेत.



शासनाने मासेमारी व्यवसायाला शेतीचा दर्जा दिल्याची घोषणा केली. सतत पडर्णाया पावसामुळे मासेमारी व्यवसाय धोक्यात आला आहे. शासनाकडून साधे मच्छीमारांचे नुकसानीचे पंचनामे देखील केले जात नाहीत. तसेच कोणतीही मदत केली जात नाही. मासेमारीला शेतीचा दर्जा दिल्याची घोषणा फक्त हवेतच विरली का? असा प्रश्न मच्छीमारांनी उपस्थित केला आहे.

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने समुद्रावर सुसाट वारा सुटला आणि मच्छिमारीसाठी गेलेल्या बोटी समुद्रात अडकल्या. जीवावर उदार होऊन मच्छीमारांनी नजीकच्या बंदरात आश्रय घेतला. शेतर्कयाबरोबर समुद्रावर आपली शेती करणारे मच्छीमारही सततच्या पावसामुळे आणि वादळामुळे मोठ्या संकटात सापडले आहेत. त्यांचे श्रम, खर्च आणि वेळ वाया गेला आहे. त्यामुळे मच्छिमारांनाही शासनाने सानुग्रह मदतीचा हात दिला पाहिजे, अशी मागणी अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असल्याची माहिती समितीचे कार्याध्यक्ष बर्नार्ड डिमेलो यांनी दिली आहे.

# पाटोळेंच्या उपायुक्तपदाला सरकारची मान्यता नाही

**■ठाणे। प्रतिनिधी:**

पात्रता नसलेल्या आणि भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपांना सामोरे जार्णाया शंकर पाटोळे यांना ठाणे महापालिकेत उपायुक्तपदी बसवणे म्हणजे ठाणेकर जनतेच्या विश्वासाशी केलेला



विश्वासघात आहे. पाटोळे यांच्या उपायुक्तपदाच्या नियुक्तीला सरकारची मान्यता नसल्याचा आरोप ठाणे शहर काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी केला. काँग्रेसने केलेल्या खुलाशानुसार, २००४ मध्ये उप समाजविकास अधिकारी म्हणून लागलेले पाटोळे, २०१० मध्ये समाजविकास अधिकारी झाले. त्यानंतर सहाय्यक आयुक्त पदाचा अतिरिक्त पदभार म्हणून संवेदनशील प्रभाग समित्यांमध्ये काम करत त्यांनी पूर्ण वेळ सहाय्यक आयुक्त पदाच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा केला.

सहाय्यक आयुक्त पदावरील नियुक्तीस मान्यता मिळण्याबाबतच्या पालिकेच्या पत्राच्या अनुषंगाने शासनाने माहिती सादर करण्यास सांगितले असता प्रस्तावात नमूद केलेल्या अधिर्कायांची विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित नसल्याचा प्रथम अहवाल महापालिकेने दिला आणि याबाबतच्या दुर्सया अहवालात मात्र शंकर पाटोळे यांच्याबाबत बीएसयुपी अनियमितता, अँटी करप्शन ब्युरोतील तक्रार, अनधिकृत बांधकामांना दिलेले संरक्षण, तसेच नागरिकांकडून आलेल्या तक्रारी प्रलंबित असल्याबाबत म्हणणे सादर केले. परंतु शासनाने आजवर पाटोळे यांच्या सहाय्यक आयुक्त पदालाच मान्यता दिलेली नाही, हे धक्कादायक वास्तव असून अशा स्थितीत त्यांची पदोन्नती ही पूर्णपणे बोगस व बेकायदेशीर असल्याचा काँग्रेसचा दावा आहे. याचबरोबर, पाटोळे यांची २०१८ ते २०२१ कालावधीत झालेल्या अनधिकृत बांधकामाबाबत चौकशी चालू असताना व सहाय्यक आयुक्त पदाची शासन मान्यता नसताना उपायुक्तपदी नेमल्याने महापालिकेच्या कारभारातील ह्यभ्रष्टाचाराचा गडह्ण उघड झाल्याचे पिंगळे म्हणाले. आम्ही अनेकदा पुराव्यानिशी आयुक्तांकडे तक्रारी दाखल केल्या. तत्कालीन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीसुद्धा या अधिर्कायाची कारकीर्द भ्रष्टाचाराने बरबटलेली असल्याचे लेखी पत्राद्वारे स्पष्ट केले. पण तरीही या अधिर्कायाला राजकीय आशीवार्दाने अभय देण्यात आले, ठाणेकरांची ही थेट फसवणूक आहे, असा थेट आरोप काँग्रेसने केला.

# न्यायालयातून पळालेल्या आरोपीचे पुन्हा दुष्कृत्य... ७ वर्षाच्या मुलीला अत्याचारानंतर संपवल

**■ठाणे। प्रतिनिधी:**

भिवंडी सत्र न्यायालयातून पळाल्यानंतर दोन महिन्यापासून फरार असलेल्या हत्या, पोक्सोच्या गुन्ह्यातील एका आरोपीने सात वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार करत तिची हत्या केल्याची खळबळजनक बाब भिवंडीमध्ये घडली आहे.

पोलिसांनी या आरोपीला भिवंडीतून अटक केली आहे. त्याने दोन वर्षापूर्वी सहा वर्षाच्या मुलीची अत्याचारानंतर हत्या केली होती. सलामतअली आलम अन्सारी (३०) असे या आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने त्याला ८ ऑक्टोबर पर्यंत पोलिस कोठडी दिली आहे.

सन २०२३ मध्ये सलामतअली याच्याविरुद्ध हत्या, अपहरण, पोक्सो अंतर्गत भिवंडी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात सुनावणीसाठी ४ ऑगस्ट रोजी त्याला ठाणे मध्यवर्ती कारागृहातून पोलिस बंदोबस्तात भिवंडी सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने पुढील तारीख दिल्याने पोलिस पुन्हा त्याला घेऊन जाण्यासाठी निघाले. मात्र, गदीर्चा फायदा घेत सलामतअली न्यायालयातून पळाला. या प्रकरणी सहा पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. सर्वत्र शोध घेऊनही हा आरोपी पोलिसांना सापडला नाही.

फरार असलेला सलामतअली गावी बिहारला गेला. नंतर पुन्हा भिवंडीत आला होता. दरम्यान, १ ऑक्टोबर रोजी त्याने सात वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार करत तिची हत्या केली. भिवंडीत घडलेल्या या प्रकाराप्रकरणी निजामपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सलामतअलीचा शोध घेण्यासाठी पोलिस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी परिमंडळ दोनमधील विशेष पथकांची स्थापना केली. तांत्रिक माहितीच्या आधारे भोईवाडा पोलिस ठाण्याच्या पथकाने ३० वर्षांच्या या आरोपीला भिवंडीतून अटक केल्याची माहिती पोलिसांनी दिली.



**अंबरनाथमधील महिलेशी जवळीक, लग्नाच्या आमिषाने डॉक्टरकडून अत्याचार**

अंबरनाथमध्ये एका विधवा महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याच्या आरोपाखाली ऑर्थोपेडिक सर्जनला अटक करण्यात आली आहे. या धक्कादायक घटनेने पुन्हा एकदा डॉक्टर या पेशातील विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला अंबरनाथची रहिवासी असून तिचा पती काही महिन्यांपूर्वी निधन पावला होता. मृत पती हा या आरोपी डॉक्टरचा पेशंट होता. पतीच्या निधनानंतर डॉक्टरने महिलेला मानसिक आधार देण्याच्या बहाण्याने जवळीक साधली आणि नंतर तिला लग्नाचे आमिष दाखवले. या आमिषाखाली आरोपीने वारंवार तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवले. विधवा महिलेच्या दुःखद परिस्थितीचा फायदा घेत, तिच्या भावनिक अवस्थेचा गैरवापर करून आरोपीने तिला फसवलं. बराच काळ संबंध ठेवल्यानंतर, लग्नाच्या आश्वासनात काहीच तथ्य नसल्याचं महिलेला समजलं आणि तिने तात्काळ पोलिसांत धाव घेतली. महिलेच्या तक्रारीवरून अंबरनाथ पोलिसांनी या डॉक्टरला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेनंतर स्थानिक परिसरात संतापाची लाट उसळली आहे. समाजातील एक सन्माननीय समजल्या जाणाऱ्या व्यावसायिकाकडून अशा अमानुष कृत्यामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com